


पान ८ वर

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. २ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २७३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## भारतात होणाऱ्या क्रिकेट विश्वचषकात वेस्ट इंडिजला नो एन्ट्री



**हरारे** : दोन वेळा विश्वचषकावर नाव कोरणाऱ्या वेस्ट इंडिजचे यंदाच्या विश्वचषकात खेळण्याचे स्वप्न अपुर्ण राहणार आहे. झिम्बाब्वे येथे सुरु असलेल्या क्वालिफायर स्पर्धेत मोठा उलटफेर झाला आहे. स्कॉटलँडने वेस्ट इंडिजचा पराभव केला आहे. या पराभवामुळे वेस्ट इंडिजला भारतात होणाऱ्या विश्वचषकात भाग घेता येणार नाही. पात्रता फेरीतच वेस्ट इंडिजचे आव्हान संपुष्टात आलेय. सुपर सिक्स फेरीच्या सामन्यात स्कॉटलँड संघाने वेस्ट इंडिजला ७ गडी राखून पराभूत केले. वेस्ट इंडीज २०२३ वनडे विश्वचषकासाठी पात्र होण्याच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. पहिल्या २ वनडे विश्वचषकाचे विजेतेपद जिंकणाऱ्या वेस्ट इंडिज संघाला आता भारतात होणाऱ्या विश्वचषकात सहभागी होता येणार नाही.

# ‘समृद्धी’वर मृत्यूचे थैमान...

## बुलढाण्याजवळ खाजगी बस पेटून २५ प्रवाशांचा जागीच होरपळून मृत्यू

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मृत्यूचा सापळा ठरलेल्या मुंबई- नागपूर या समृद्धी महामार्गावर शनिवारी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. नागपूरहून पुण्याकडे निघालेली एक खाजगी प्रवासी बस बुलढाण्याजवळ पेटून झालेल्या दुर्घटनेत २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला.बसमध्ये एकूण ३३ प्रवासी होते.त्यातील आठजण सुदैवाने सुखरूप बाहेर पडले. सिंदखेडराजाजवळ पिंपळखुटा गावालगत हा अपघात झाला. या अपघाताने सारा महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. हा महामार्ग खुला केल्यापासून दररोज अपघातांची मालिका सुरूच आहे.या महामार्गावरच्या त्रूटी दूर कराव्यात,अशी मागणी जाणकारांकडून सातत्याने होते आहे मात्र सरकार त्या उपाययोजना कधी करणार? असा प्रश्न राज्यातून विचारला जात आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मृतांच्या वारसदारांना ५ लाखांची मदत जाहीर केली आहे.**



अपघातग्रस्त बस ही नागपूरहून पुण्याकडे जात होती. या बसमध्ये नागपूर, वर्धा, आणि यवतमाळचे प्रवासी होते. ही बस विदर्भ ट्रॅव्हल्सची होती. सिंदखेडराजाजवळ पिंपळखुटा गावालगत समृद्धी महामार्गावर रस्ता दुभाजकाला ती धडकली आणि त्यानंतर बसने पेट घेतला. डिझेलच्या संपर्कात आल्याने बसने वेगाने पेट घेतला.बसच्या काचा पॅकबंद होत्या.आतील प्रवाशांनी काचा फोडून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला.काचा फुटल्या नाहीत.रात्रीच्या वेळी मदत कोण करणार? बसचा दरवाजा गाडीखाली आल्याने कोणालाच बाहेर येता आले नाही.काळ आणि वेळच समोर आल्याने अशा कठीण प्रसंगात २५ प्रवाशांचा आगीत होरपळून मृत्यू झाला.

चालक आणि वाहक सुखरूप बाहेर पडले.चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

अपघातानंतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर बसमधील डिझेल सांडले. त्यामुळे एक तर डिझेल टँक फुटली असावी किंवा डिझेल टँक मधून इंजनकडे सप्लाय होणारा पाईप फुटला असावा, त्यामुळेच बसने पेट घेतला असल्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. जे लोक बचावले आहे, त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे जे लोक काचेची खिडकी हाताने फोडून बाहेर निघू शकले त्यांचा जीव वाचला. बसमधून २५ मृतदेह पोलिसांनी बाहेर काढले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनास्थळी भेट दिली. याबाबत जिल्हाधिकारी तेथील पोलीस अधिकारी यांच्याशी बोललो आहे. जखमींना रुग्णालयात दाखल केले आहे. त्यांच्यावर चांगले उपचार करण्याच्या सूचना मी दिल्या असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

जखमी रुग्णांचा खर्च राज्य सरकारच्या वतीने करण्यात येईल तसेच मृतांच्या नातेवाईकांना राज्य शासनाकडून पाच लाखांची मदत दिली जाणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. समृद्धी महामार्गावर प्रशासन योग्य त्या उपाययोजना करत आहे. काही वेळेला वेगावर नियंत्रण नसल्यानेही अपघात होत आहेत. त्यामुळे वाहनचालकांनी देखील वाहन चालवताना काळजी घेणे गरजेचं असल्याचे शिंदे म्हणाले. या अपघाताच्या चौकशीचे आदेश उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत.

### बस अशी ठरली कर्दनकाळ...

बस पहिल्यांदा लोखंडी पोलला धडकली. त्यानंतर ही बस रस्ता दुभाजकाला धडकली. त्यानंतर बस पलटी झाली. बसचा दरवाजा गाडीखाली आल्याने कोणालाच बाहेर येता आले नाही. वाचलेले प्रवासी गाडीच्या काचा फोडून बाहेर आले. पोलीस आणि घटनास्थळी असलेल्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, बस सर्वात आधी नागपूरवरून औरंगाबादच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर उजवीकडे एका लोखंडी पोलला धडकली. अनियंत्रित होऊन पुढे जाऊन येणाऱ्या आणि जाणाऱ्या दोन्ही लेनच्या मध्ये असलेल्या काँक्रीटच्या दुभाजकाला धडकली आणि पलटली. बस पलटी होताना डाव्या बाजूने पलटली. त्यामुळे बसचे दार खाली दाबले गेले. त्यामुळे लोकांना बाहेर पडण्यासाठी मार्ग नव्हता.

### नेमकं कारण काय?

बुलढाणा बस अपघात ड्रायव्हरच्या चुकीमुळे किंवा ड्रायव्हरला झोप लागल्यामुळे झाला असण्याचाही एक शक्यता वर्तवली जात आहे. हा अपघात ड्रायव्हरचा गाडीवरचा ताबा सुटल्याने झाला की ड्रायव्हरला आलेल्या मानसिक आणि शारीरिक थकव्यामुळे झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### केंद्राकडून २ लाखांची मदत

बुलढाणा बस अपघाताच्या घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. बुलढाणा येथील बस दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना केंद्र सरकारकडून २ लाखांची मदत दिली जाणार आहे. तर जखमींना ५० हजारांची मदत दिली जाणार आहे. याबाबतची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे.

## शिरवळवाडी अपघातातील चालकाविरोधात गुन्हा

**अक्कलकोट** : शिरवळवाडी (ता. अक्कलकोट) येथे अपघातातील बल्कर चालका विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. हसन अजमोद्दीन पटेल (वय २३, रा.बोरगांव देशमुख, ता.अक्कलकोट) असे त्याचे नाव आहे. रात्री उशिरा उत्तर पोलीस स्टेशन मध्ये त्याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

आरोपीला शनिवारी अटक केली असून रविवारी कोर्टासमोर हजर करणार असल्याची माहिती तपास अधिकारी उत्तर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पुजारी यांनी माहिती दिली. बल्कर चालकाविरोधात शिरवळवाडी गावाजवळ भाविकांच्या क्रुझरला शुक्रवारी अपघात झाला होता. या अपघातामध्ये सहा जणांचा जागीच मृत्यू झाला होता. अकरा जखमी होते.

## टेम्पो दुभाजकावर जाऊन पलटी; एक ठार, दोन जखमी

### यावली जवळील घटना

सुराज्य/मोहोळ

वाळू वाहतूक करणारा टेम्पो भरधाव वेगाने दुभाजकावरून चढून पलटी होऊन झालेल्या अपघातात एकजण जागीच ठार तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना यावली येथील येथे शनिवारी पहाटे अडीचच्या दरम्यान घडली.

महादेव वाघमोडे हा मोहोळ येथील सुदर्शन सुभाष गायकवाड याच्या टेम्पोवरती मजुरी करण्यासाठी जात होता. ३० रोजी अंजनगांव येथे जाऊन महादेव एम.एच १२. सी.टी ७७७१ हा टेम्पो गेला होता. गाडीमधून सुदर्शन गायकवाड हा वाळूची अवैध वाहतूक करीत होता. त्या वाहनांवर प्रमोद महादेव जाधव (रा. पाची पट्टा) हा चालक म्हणून गाडी चालवीत होता. १ रोजी पहाटे पावणेतीनच्या सुमारास ही गाडी पुणे ते सोलापूर जाणारे हायवे रोडवर मोहोळच्या दिशेने येत होती. यावेळी टेम्पो चालक प्रमोद जाधव याने भरधाव वेगाने चालवली. ताबा सुटल्याने गाडी दुभाजकावर चढून पलटी झाल्याने अपघात झाला त्या अपघातामध्ये महादेव वाघमोडे मयत झाला. तर टेम्पोचा चालक प्रमोद जाधव व सोमनाथ जाधव हे गंभीर जखमी झाले. द खेलोबा राजाभाऊ वाघमोडे यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यावरून टेम्पो मालक सुदर्शन गायकवाड व टेम्पो चालक प्रमोद जाधव यांच्यावर विरुद्ध मोहोळ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास मोहोळ पोलीस करीत आहेत.





○ समृद्धीवरचे भयाण वास्तव...

## वाहने पेट घेतल्यास मृत्यूशिवाय गत्यंतरच नाही

सुराज्य/नागपूर

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग सुरू होऊन सहा महिने लोटल्यानंतरही या मार्गावर प्रवाशांचे जीव वाचविण्याबाबत सुविधा नसल्याचे आजच्या अपघातानंतर दिसून आले. नागपूरपासून २०० किलोमीटरच्या अंतरात एकही अग्निशमन केंद्र नसल्याची बाब पुढे आली आहे. वाहनाने पेट घेतल्यास प्रवाशांना मृत्यूशिवाय पर्यायच नाही, हे भयाण वास्तव आहे. समृद्धी महामार्गाचे ११ डिसेंबरला २०२२ला लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर पंधरा दिवसांत अर्थात २८ डिसेंबरला रात्री दीड वाजताच्या सुमारास पहिला अपघात झाला. यात दोघांचा मृत्यू झाला होता.

एकूण पहिल्या महिनाभरात चार गंभीर अपघात झाले असून यात १६ जण जखमी झाले. पाच किरकोळ अपघातात २० जण जखमी झाले. त्यानंतर या महामार्गावर अपघातांची मालिकाच सुरू झाली. त्यानंतर अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात राजकीय धुरळाही उडाला. तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी विरोधकांनी केली आहे. राज्य सरकारने उपाययोजनांसाठी पावले उचलली. परिवहन, रस्ते, सुरक्षा विभाग व पोलिसांनी शिर्डी ते नागपूर समृद्धी महामार्गाची पाहणी केली. आरटीओ अधिकारी आणि एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांवर चर्चा झाली. परंतु यात टायर तपासणीसोबत नागपूर-शिर्डीदरम्यान प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे आठ ठिकाणी चालकांसाठी समुपदेशन केंद्र उभारणे यावर चर्चा झाली. राज्य सरकारने उपाययोजनांबाबत पुढाकार घेतला असला तरी गांभीर्य दिसत नाही.



**‘समृद्धी’चे जीवघेणे रूप.. :** समृद्धी महामार्गाच्या लोकार्पणानंतर महिनाभरात बुलढाणा जिल्ह्यात १५ अपघात झाले. यात तीन गंभीर तर नऊ किरकोळ अपघाताचा समावेश आहे. यात दोघांचा मृत्यू झाला. एवढेच नव्हे अतिवेगाने वाहने चालविल्याप्रकरणी ३६ वाहनांवर कारवाई करण्यात आली होती. केवळ महिनाभरात बुलढाणा जिल्ह्याने समृद्धीचे जीवघेणे रूप अनुभवले.

**सुविधांचा अभाव.. :** शौचालय, प्रसाधनगृहांची सुविधा नाही. जेवणासाठी ढाबा, हॉटेल्स नाहीत. पेट्रोल पंपाची संख्या अतिशय कमी आहे. बॅरीकेट्सला लावण्यात आलेल्या कुलुपामुळे यू टर्नसाठी ६०-६० किलोमीटर अंतर कापावे लागते. परिणामी प्रवाशांची प्रकृती बिघडल्यास यू टर्न घेण्यास प्रचंड त्रास होतो आणि वेळ वाया जातो. नागपूरपासून दोनशे किलोमीटर अंतरात कुठेही अग्निशमन केंद्र नाही. मदत केंद्रही नाही. त्यामुळे अपघात झाल्यास प्रवाशांवर वेळेत उपचार होणे अशक्य आहे. त्यामुळे नाहक बळी जाण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने या मार्गावर ठरावीक अंतरावर अग्निशमन व मदत केंद्र उभारणे गरजेचे असल्याचे नागपूर ट्रॅव्हल्स असोसिएशनचे अध्यक्ष बाबा डवरे यांनी सांगितले.

## सराईत गुन्हेगार पठाण दोन वर्षाकरीता तडीपार

सुराज्य/सोलापूर



विजापूर नाका पोलीस ठाणे व एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत नागरिकांमध्ये दहशत माजवणारा आरोपी अत्ताहुलाखान हारुन पठाण (वय-४७, रा.लोकमान्य नगर, मजरेवाडी) याला सोलापूर जिल्हा व उस्मानाबाद जिल्हा येथून दोन वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे.

आगामी काळात विविध सण-उत्सव, मिरवणुका व महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये व शहरात कायदा व सुव्यवस्था तसेच शांतता अबाधित राहण्याच्या सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विजापूर नाका व एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगार अत्ताहुलाखान हारुन पठाण यांनी साथीदारांसह गुंडगिरी करणे, शिवीगाळ दमदाटी व मारहाण करून दहशत निर्माण करणे, अवैधरित्या रिक्षामध्ये घरगुती गॅस भरून परिसरातील लोकांच्या जीवितास हानी पोहचवणे असे कृत्य केले आहे. त्याच्यावर गंभीर स्वरूपाचे एकूण ५ गुन्हे दाखल आहे. त्यामुळे त्यास २४ जून रोजी पासून विजापूर नाका पोलीस स्टेशनकडून ताब्यात घेऊन सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्हा व उस्मानाबाद जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आलेले आहे, अशी माहिती विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पो.नि. बाळकृष्ण हनपुडे पाटील यांनी दिली.

## बहिणीच्या मदतीने अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**सोलापूर** : सख्ख्या बहिणीच्या मदतीने नराधमाने बहिणीच्या घरी व इतर ठिकाणी नेऊन अल्पवयीन मुलीवर तिच्या इच्छेविरोधात वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी बहीण-भावाच्या विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पंधरा वर्षीय मुलगी शाळेतून घरी जात असताना तिला रस्त्यात अडवून २२ वर्षीय तरुणाने मोटरसायकलवरून बहिणीच्या घरी नेऊन अत्याचार केला.त्यानंतर एक महिन्यांनी पुन्हा पीडित मुलीला माझे तुझ्यावर प्रेम आहे असे म्हणत तिला मोटरसायकलवर बसून बहिणीच्या घरी जाऊन तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर पुन्हा १७ मे रोजी नातेवाईकांच्या घरी जाऊन त्या मुलीवर पुन्हा अत्याचार केला. ही घटना त्या मुलीने आपल्या कुटुंबीयांना सांगितली. सदर बझार पोलीस ठाण्यात दोघा सख्ख्या बहीण-भावाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहा.फौजदार एम.ए.जाधव हे करत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आयटी पार्क येत आहे, हे त्याला सांगायला हवं !

कल्याण
580-31-128

## जिल्हा व सत्र न्यायाधीशांची निवृत्ती; अवघे न्यायालय गहिवरले

**प्रवेशद्वारापासून दुतर्फा उभे राहून ओंजळीत गुलाबाच्या पाकळया, फुलांची डॉ. औटी यांच्यावर मुक्त उधळण केली**

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हा न्यायालयाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. शब्बीर अहमद औटी हे आपल्या ३२ वर्षांच्या प्रदीर्घ न्यायिक सेवेतून निवृत्त झाले. जन्मतः दिव्यांग असूनही अधिक कार्यक्षमता, गुणवत्ता आणि संवेदनशीलता जपत न्यायदानाचे कार्य केलेले न्या. डॉ. औटी यांच्यावर पुष्पवृष्टी निरोप देताना संपूर्ण न्यायालयातील सहकारी न्यायाधीश व वकिलांसह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अश्रू आवरणे कठीण झाले होते. प्रेमाचा निरोप घेताना न्या. डॉ. औटी यांच्याही नेत्रांतून अश्रुधारा बरसल्या.

३२ वर्षांपूर्वी सोलापूर जिल्ह्यातूनच न्यायाधीश म्हणून सुरू झालेला डॉ. शब्बीर अहमद औटी यांचा प्रवास पुन्हा सोलापूर जिल्ह्यातच संपला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश पदावरून सेवानिवृत्त होताना संपूर्ण न्यायालयात कार्यरत असलेले सहयोगी न्यायाधीश, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सेवाकाळातील शेवटच्या दिवसाचे अनोख्या पद्धतीने स्वागत केले. प्रवेशद्वारापासून दुतर्फा उभे राहून ओंजळीत गुलाबाच्या पाकळया आणि फुलांची डॉ. औटी यांच्यावर मुक्त उधळण केली. या प्रेमाने डॉ. औटी अक्षरशः भारावून गेले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. ज्या न्यायिक अधिकाराच्या खुर्चीने आपणास पत, प्रतिष्ठा सर्व काही दिले, त्या पवित्र पवित्र अखेरचा प्रणाम करताना त्यांच्या भावनांचा बांध फुटला.



न्या. डॉ. औटी यांची न्यायदान क्षेत्रातील कारकीर्द उत्तुंग ठरली. अनेक प्रलंबित खटले निकाली काढताना प्रशासकीय कामकाजाचा आवाका उल्लेखनीय ठरला. अनेक महत्त्वाचे निर्णय त्यांच्या कार्यकाळात झाले. जिल्हा न्यायालयाची नवीन अकरा मजली इमारतीला प्रशासकीय मान्यता, माढा आणि करमाळा येथे वरिष्ठ दिवाणी न्यायालयाचा शुभारंभ, न्यायालय परिसरात संविधानाच्या आकर्षक उद्देशिकेचे अनावरण, वकील व न्यायिक अधिकाऱ्यांमध्ये उत्तम समन्वय आदी कामामुळे डॉ. औटी यांची कारकीर्द जिल्हा न्यायालयात ऐतिहासिक ठरली.

## विवाहितेचे १ लाखाचे गंठण पळविले

सुराज्य/पंढरपूर

रुक्मिणी मातेचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या सोलापुरातील एका महिलेच्या गळ्यातील १ लाखाचे गंठण चोरट्याने शिताफीने पळविले. ही घटना पंढरपूर येथील नामदेव पायरी ते पश्चिम द्वार परिसरात सकाळच्या सुमारास घडली.

यासंदर्भात पौर्णिमा विनोद चव्हाण (वय २८ रा.बनशंकरी नगर जुळे सोलापूर) यांनी पंढरपूर शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या आपल्या पतीसोबत रुक्मिणी मातेचे दर्शन घेण्यासाठी गेल्या होत्या . त्यावेळी गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांच्या गळ्यातील २५ ग्रॅम सोन्याचे गंठण पळविले. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार हेंबाडे पुढील तपास करीत आहेत.

# तरुणास मारहाण; खिशातील मोबाईल आणि रोकड लुटली

✔ सुराज्य/सोलापूर

कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथील खडी केंद्र रोडवर रस्त्यावरून पायी जाणाऱ्या तरुणास मारहाण करून अनोळखी इसमानी मोबाईल आणि पैसे लुटून पोबारा केला. ही जबरी चोरीची घटना काल शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. ओंकार बापू गायकवाड (वय १९ रा.नवीन घरकुल कुंभारी) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी मीनाक्षी गायकवाड (आई) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पहाटे दाखल केले. ओंकार गायकवाड हा काल रात्री अकरा वाजेच्या सुमारास रात्री १० वाजेच्या सुमारास घराकडे निघाला होता. खडीमशीन रस्त्यावर अनोळखी तीन ते चार लोकांनी त्याला मारहाण केली . आणि त्याच्या खिशातील मोबाईल आणि पैसे लुटून पोबारा केला . अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

**रिक्षा उलटून दोन मुलासह तिघे जखमी**

रिक्षातून जात असताना पाठीमागून मोटर धडकल्याने रिक्षा उलटून दोन मुलासह तिघेजण जखमी झाले . हा अपघात कुमठा नाका येथील क्रीडा संकुल जवळ शनिवारी सकाळच्या सुमारास घडला . संतोष बबन गायकवाड (वय ४३ रा. शास्त्रीनगर) आयोध्या विनायक गवळी (वय १२ ) आणि




ओंकार दिनेश माळवदकर (वय ११ दोघे रा.वेणुगोपाल नगर, कुमठा नाका) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले . ते तिघेजण रिक्षातून सकाळी ७ वाजेच्या सुमारास कुमठा नाका ते मॉडर्न प्रशालेच्या दिशेने निघाले होते. क्रीडा संकुल जवळ पाठीमागून मोटार धडकल्याने हा अपघात घडला. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे .

**लाचेची मागणी प्रकरणी आरोपीस पोलीस कोठडी**

४ हजार रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दाखवली म्हणुन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयातील वरिष्ठ लिपिक हेमंत माडीवाळप्पा नाईकवाडी (वय-४४) यांच्यावर गुन्हा दाखल करत अटक करून शनिवारी न्यायालयात हजर केले असता जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एन.पांढरे यांनी यास सोमवार पर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

यातील तक्रारदार यांच्या विरोधात जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,तथा सावकाराचा सहाय्यक निबंधकांकडे दावा दाखल केलेला होता. दाव्यास स्थगिती मिळण्यास उच्च न्यायालय,मुंबई येथे अर्ज दाखल करण्यासाठी तक्रारदार यांचे विरुध्द दाखल दाव्यातील रोजनाम्याचे नक्कला मिळण्याबाबत तक्रारदार यांनी अर्ज दिला होता. हेमंत नाईवाडी यांनी ४ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने त्यांना पकडले होते. म्हणून सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आरोपीच्या वतीने ॲड. निलेश जोशी तर सरकारी वकील म्हणून आनंद कुर्डुकर यांनी काम पाहिले.

**लोणारवाडी येथे आत्महत्येचा प्रयत्न**

लोणारवाडी (ता.पंढरपूर ) येथे राहणाऱ्या शिवाजी बाबुराव काळेल (वय ३०) या तरुणाने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. काल शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास त्याने राहत्या घरात विष प्राशण केले होते . त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून नवनाथ काळेल (भाऊ) यांनी बेशुद्ध अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## गर्भपातच्या गोळ्या विकणारा पोलिसांच्या ताब्यात

✔ **परंडा** : परंडा येथे गर्भपाताच्या आणि सेक्सच्या गोळ्या विक्री करण्यासाठी आलेल्या बार्शीच्या एका तरूणाला परांडा येथे पोलीसांनी अटक केली आहे. आकाश ढोबळे असे त्याचे नाव आहे. बार्शीचा हा तरूण सोलापूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यात अशा प्रकारच्या गोळ्या विकत असल्याची माहितीही सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आता त्याच्याकडून कोणते औषध दुकानदार अशा गोळ्या खरेदी करत होते. त्या गोळ्या तो नेमक्या कोणाकडून आणत होता, याचाही तपास पोलीस करणार आहेत. बार्शीतील सुभाषनगर परिसरात राहणारा आकाश ढोबळे हा तरूण परांडा शहरात एका कारमधून गर्भपाताच्या गोळ्या आणि एमटीपी किट सह सेक्सच्या गोळ्या घेऊन जात असल्याची माहिती अन्न व औषध विभागाचे निरीक्षक श्रीकांत पाटील यांना मिळाली. त्यांनी ढोबळेच्या हालचालीवर पाळत ठेवली. शनिवारी तो कार घेऊन परांडा येथे येत असल्याची माहिती पाटील यांना मिळताच त्यांनी सापळा लावला आणि परांडा बस स्थानकाजवळील रमाई चौकात त्याला ताब्यात घेतले. यावेळी त्याच्या कारमध्ये या गोळयांचा मोठा साठा असल्याचे दिसले. या सर्व गोळ्या जप्त करण्यात आल्या असून त्याच्या विरोधात परांडा पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. पोलिस निरिक्षिक अमोद भुजबळ यांच्या मार्गदर्शना खाली सहाय्यक पोलिस निरिक्षिक कवीता मुसळे, पोकॉ योगेश यादव, चालक पोकॉ कांबळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## विष देऊन शेळ्या, बोकड मारल्याचा संशय; दोघांवर गुन्हा

✔ **बार्शी** : विषारी औषध देवून ३ शेळया व १ बोकड मारून ६५ हजार रूपयांचे नुकसान केल्याप्रकरणी एका महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून दोघांविरोधात बार्शी शहर पोलीसांत गुन्हा दाखल झाला आहे. अय्याज रफिक शेख व सरताज रफिक शेख (रा. बार्शी)अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. अनुसया प्रभाकर देशमुख रा. बालाजी कॉलनी, स्वामी नारायण मंदीराच्या जवळ, बार्शी यांनी फिर्याद दिली आहे. देशमुख यांचा शेळीपालनाचा व्यवसाय असून संशयित आरोपी हे त्यांच्या घराशेजारी राहतात. गटारीचे कारणावरून तसेच आरोपींनी लावलेली झाडे शेळया खातात यावरून देशमुख व आरोपीत भांडण होत होते. त्या भांडणात तुमच्या शेळयांचा काटाच काढतो असे बोलत होते. त्यानंतर दि. १९ जून ते २९ जूनच्या दरम्यान देशमुख यांच्या ३ शेळया व १ बोकड कांही दिवसांच्या अंतराने सकाळी मरून पडलेले दिसत असे. दोघांनीच कोणतेतरी विष कशाततरी टाकून ते शेळयांना खाण्यास घातलेने त्यामध्ये फिर्यादीच्या शेळया व बोकड मेलेले असून त्यात सुमारे ६५ हजार रूपयांचे नुकसान झाल्याचे देशमुख यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

## विनापरवाना गोमास विक्री प्रकरणी गुन्हा दाखल

✔ **बार्शी** : विनापरवाना बेकायदेशीररित्या गोवंश जातीच्या प्राण्याची हत्या करून त्याचे मांस विक्री केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीसांत अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीसांनी गुन्हयातील वाहन जप्त केले आहे. पो. कॉ दिपक शिवाजी नकाशे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. शहरातील एकविराई मंदिराजवळील अपोलो हॉटेल जवळ दोन प्राणिमित्र थांबले होते. त्यावेळी दुपारी २.३० वा चे सुमारास तेथे एक वाहन उभे असलेले व त्याच्या शेजारी तीन मोटारसायकली दिसल्या. टमटम मधून मोटारसायकलवर गाठोडे ठेवत असल्याचे दिसल्याने त्याबाबत संशय आल्याने ते टमटम जवळ गेले व काय आहे असे विचारले टमटममधील व्यक्ती उडी मारून पळून गेला. टमटम मध्ये ३० किलो मांस होते. पशुधन विकास अधिकारी यांना बोलावल्यानंतर त्यांनी तपासणी करून सदरचे मांस हे गोवंश सदृश्य प्राण्याचे असल्याचे सांगितले. पोलीसांनी टमटम एम एच १२ डी जी ५३८४ ताब्यात घेतला. अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला

## युवक क्रांती दलातर्फे उद्या बार्शीत जाहीर सभा

✔ **सोलापूर** : वाळू माफियांच्या विरोधात तक्रार करून कारवाईची मागणी केली म्हणून सामाजिक कार्यकर्ते आकाश दळवी व त्यांच्या सहकाऱ्यांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला. बार्शी शहरातील दहशत कमी होऊन विवेक वाढावा आणि सामाजिक कार्यकर्ता आकाश दळवी यांना न्याय मिळवून देण्यासाठी युवक क्रांती दलाच्या वतीने सोमवार दिनांक ३ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता पांडे चौक, बार्शी येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती युवक क्रांती दलाचे कार्यवाह जामुवंत मनोहर यांनी पत्रकार परिषदेत दिली. जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी पर्यावरण तज्ञ डॉ. प्रवीण सप्तर्षी, सामाजिक चळवळीतील ज्येष्ठ नेते वसंत साळवे, रिपब्लिकन युवा मोर्चाचे नेते राहुल डंबाळे आदी उपस्थित राहणार आहे. या पत्रकार परिषदेत मनीष देशपांडे, दत्ता दळवी ,यशवंत फडतरे आदी उपस्थित होते.

## जानप्पा जंगम यांचे निधन



✔ **सोलापूर** : श्री जांबमुनी मोची समाज सेवा मंडळ लष्कर येथील ज्येष्ठ सल्लागार व जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे माजी ओ. एस. डॉ. जानप्पा आशप्पा जंगम यांचे दि. १ जुलै रोजी दुपारी २.०० वाजता दिर्घ आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. तरी त्यांची अंत्ययात्रा राहत्या घरापासून दि. ०२ रोजी सकाळी ११.०० वाजता निघणार आहे.

# मुलांच्या स्वप्नपूर्तीसाठी पालकांनी पाठबळ द्यावे : आव्हाळे

**मराठा सेवा संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव**

✔ सुराज्य/सोलापूर

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश खरंच कौतुकास पात्र आहे. मात्र विद्यार्थ्यांनी यावरच न थांबता मोठी स्वप्न बघावी आणि ती स्वप्न पूर्ण करण्यासाठी जबाबदारी पालकांनी आपल्या खांद्यावर घेऊन त्या विद्यार्थ्यांना पाठबळ द्यावे, अशी अपेक्षा सहाय्यक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे यांनी व्यक्त केली.

मराठा सेवा संघाच्या वतीने इयत्ता दहावी, बारावी आणि इतर विविध परीक्षांमध्ये यश प्राप्त केलेल्या मराठा



समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळ्यात आव्हाळे बोलत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद महाविद्यालयाचे प्रा. डॉ विजयकुमार उबाळे उपस्थित होते. यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत पाटील, शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील, उपाध्यक्ष डा. जी. के. देशमुख, जिल्हा समन्वयक दत्ता मुळे , जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव पवार, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत, शहराध्यक्ष प्रकाश ननवरे, जिल्हा परिषद शाखेचे अध्यक्ष अविनाश गोडसे ,कोषाध्यक्ष आर. पी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील यांनी गौरव सोहळा घेण्यामागील उद्देश प्रास्ताविक भाषणातून स्पष्ट केला. डॉ उमेश मुगले यांनी ॲडमिशन प्रोसेस विषयी मार्गदर्शन केले. आव्हाळे म्हणाल्या सध्या स्पर्धेचे युग आहे. कोणतेही यश मिळायचे असेल तर खूप कष्ट आणि मेहनत करावी लागते, त्यामुळे मुलांनी मोठी स्वप्न बघावी. हा कार्यक्रममासाठी हनुमंत पवार, प्रवीण थोरात, सुजय वाघचवरे, डॉ एस एम चव्हाण, दीपक शेळके, परशुराम पवार, राम माने, एम एन पवार, प्रा आर एस चव्हाण, प्रा जे के रोमन , रमेश जाधव, गोवरधन गुंड यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन संतोष माने यांनी केले आभार डॉ उमेश मूगले यांनी मानले.

## वैराग येथे ६५ हजाराची घरफोडी

✔ सुराज्य/वैराग

येथील शारदा देवी नगरात राहणाऱ्या दत्तात्रय दशरथ पवार यांच्या बंद घराचा कडी कोयंडा तोडून चोरट्याने कपाटातील रोख ५ हजार रुपये आणि १७ ग्रॅम सोन्याचे दागिने पळविले . ही चोरी काल शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात दत्तात्रय यांचे भाऊ शशिकांत पवार यांनी वैराग पोलिसात फिर्याद दाखल केली. हवालदार गवळी पुढील तपास करीत आहे.

## डॉ. जयसिध्देश्वर महास्वामींच्या वर्धापन सोहळ्याचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर

प्रतिवर्षाप्रमाणे शिवयोग धाम, शेळगी येथे गुरुपौर्णिमा महोत्सव व शिवाचार्यरत्न डॉ. जयसिध्देश्वर महास्वामींचा वर्धापन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनही केल्याची माहिती शिवयोग धाम सेवा समितीच्यावतीने देण्यात आली आहे.



वीरशैव माहेश्वर वैदिक मंडळ सोलापूर व श्री.शिवयोग धाम सेवा समितीच्या संयुक्त सहकार्याने हा सोहळा संपन्न होणार आहे. शनिवारी १ जुलै रोजी श्री १००८ काशी जगद्गुरु मल्लिकार्जुन विश्वराध्या शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सानिध्यात धर्म ध्वजारोहण करण्यात आले. २ जुलै रोजी सकाळी आठ वाजता शतचंडी होम, रुद्रयाग होणार आहे. ३ जुलै रोजी पहाटे पाच ते सात वीरभद्रेश्वर स्वामीस रुद्राभिषेक, सहस्त्रबिल्वार्चन, अलंकार पूजा व सकाळी सात ते नऊ पर्यंत इष्टलिंग महापूजा बिल्वार्चन आरती, पादपूजा व तीर्थप्रसाद होईल. सकाळी अकरा ते बारा दरम्यान गुरुपौर्णिमा महोत्सव व गुरुवर्गाचे वर्धापन सोहळा व धर्मसभा होईल. यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

## मंगळवारी ग्रामदैवत श्री अकलाईदेवीचा भंडारा

✔ सुराज्य/अकलूज

अकलूज गावचे ग्रामदैवत श्री अकलाई देवीचा भंडारा (यात्रा) मंगळवार ४ जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे.

यात्रेनिमित्त गेले ३८ वर्षापासून अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच किशोरसिंह मारुतराव माने - पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकलाई देवी मंदिर व मंदिर परिसर स्वच्छता व साफसफाई करण्यात येते. सालाबाद प्रमाणे ही वर्षी मंदिर व परिसर साफसफाई करण्यात आली.

स्वच्छता व साफसफाई साठी



लोकमान्य गणेश मंडळ गांधी चौक अकलूज, साई सेवा ट्रस्ट संग्राम नगर अकलूज, शिवरत्न गणेश मंडळ विजय चौक अकलूज, स्वामी विवेकानंद मंडळ व शिवगर्जना ग्रुप अकलूज, अकलूज शहर बुरुड समाज व युवा मंच, अकलूज शहर वडर समाज, श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ क्रांतिसिंह नगर अकलूज, श्री स्वामी समर्थ ग्रुप अकलूज व अकलूज नगर परिषद या सर्वांनी उपक्रमामध्ये सहभाग घेतला. देवस्थानतर्फे सर्व मंडळांचा सन्मान करण्यात आला.

## 'डॉ. कुलकर्णी यांच्यासारखे नावलौकिक मिळवण्याची जिद्द ठेवा'

✔ सुराज्य/श्रीपूर

ज्याप्रमाणे कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी यांनी उच्च शिक्षण घेण्याची जिद्द ठेवून ते मिळून नावाजलेल्या कारखान्यात मोठ्या पदावर काम करून नावलौकिक मिळवला त्याप्रमाणे विद्यार्थिनी, विद्यार्थ्यांनी ही उच्च शिक्षण घेण्याची जिद्द ठेवावी असा सल्ला पत्रकार महादेव जाधव यांनी विद्यार्थ्यांना दिला.

महाळुंग जि.प.शाळा मुंडफणेवाडी शाळेत पांडुरंग कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त लोणकर कॉम्प्युटर्स अकलूज यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप,प`न, पेन्सिल वाटप,खाऊ वाटप व वृक्षारोपण कार्यक्रमा चे आयोजन करण्यात आले होते, यावेळी महादेव



जाधव बोलत होते.

प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक समीर लोणकर यांनी केले. यानंतर पत्रकार महादेव जाधव, प्रकाश केसकर, विजयकुमार देशमुख ,संदीप लोणकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप,पेन ,पेन्सिल वाटप व खाऊ वाटप करून वाढदिवसानिमित्त पत्रकार बांधवांच्या हस्ते शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

जाधव म्हणाले की, डॉक्टर यशवंत कुलकर्णी गेली १२ ते १३ वर्षा पासून साखर कारखानदारी मध्ये कार्यकारी संचालक पदावर चांगले काम करत असून त्यांच्या कामाचा नवलौकिक पूर्ण महाराष्ट्रभर आहे. त्यांच्यासारखीच उच्च शिक्षण शिकण्याची जिद्द ठेवून त्याप्रमाणे शालेय शिक्षणात प्रगती ठेवावी आणि शाळेतील शिक्षक वर्गाने, आई वडीलांनी दिलेले संस्कार अंगी बाळगून त्याप्रमाणे आचरण ठेवावे. यावेळी शाळेतील सहशिक्षिका अर्चना वाघ, अंगणवाडी सेविका रेखा मुंडफणे, मदतनीस सोनाली मंडले, राणी धायगुडे, पालक चंद्रसेन चव्हाण, सुनील सावंत,विठ्ठल धायगुडे उपस्थित होते. आभार समीर लोणकर यांनी मानले.

## माध्यमिक शिक्षणधिकारी जावेद शेख यांची लातूरला बदली

✔ सुराज्य/सोलापूर

महिला व बाल विकास जिल्हा कार्यक्रम अधिकारी तथा प्रभारी माध्यमिक शिक्षणाधिकारी जावेद शेख यांची लातूर येथे प्रशासकीय बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी औरंगाबाद जिल्हा परिषदेचे प्रसाद मिरकले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने ३० जून रोजी बदलीचा आदेश जारी केला आहे. माजी डेप्युटी सीईओ देवत्त गिरी यांची बदली सोलापूरहून लातूर येथे झाली होती .अगदी त्याच पद्धतीने जावेद शेख यांची बदली झाली आहे. जावेद शेख हे मुळचे बार्शीचे असून त्यांनी महीला बालकल्याण विभागात नाविण्यपूर्ण योजना राबविण्याचा यथोचिछित प्रयत्न केला. माजी सदस्य त्रिभुवन धाईंजे आणि उमेश पाटील यांनी सर्वसाधारण सभेत प्रश्नांचा भडीमार करीत व्यासपीठाला धारेवर धरले होते. टप्पा अनुदान कार्यक्रमा प्रसंगी गोंधळ उडाला होता. दरम्यानच्या काळात सीईओ दिलीप स्वामी यांनी जावेद शेख यांच्याकडे प्रभारी माध्यमिक शिक्षणाधिकारीची जबाबदारी सोपवली होती. शासनाने दिलेल्या नियमानुसारचं टप्पा अनुदानाची प्रक्रिया व्यवस्थितरित्या पार पडल्या जावेद शेख यांनी सांगितले.

# लक्षभोजनातील आठवणींना वारीतील आज्जीने दिला उजाळा

**'तो' किस्सा विजयदादांनाच सांगते; उपस्थित सर्वच भारावले**

✔ सुराज्य/अकलूज

अकलूज ९५ वर्षाची आज्जी संत तुकोबाराया महाराजांचा पालखी सोहळा अकलूज येथे आल्यानंतर विजयदादा यांच्या जवळ येते आणि आम्हीं ऊस तोडायला माळशिरस तालुक्यात आलो होतो त्यावेळेस शंकरराव मोहिते यांच्या मुलाच्या लग्नात जेवण केले होते असा किस्सा विजयदादांनाच सांगते आणि नंतर तिला कळते हेच ते विजयदादा आहेत ज्यांच्या लग्नात आपण जेवण केले होते आणि तो प्रसंग पुढे ती आज्जी सांगत जाते आणि उपस्थित सर्वच भारावून जातात.

हा किस्सा आहे अकलूज येथे संतश्रेष्ठ तुकोबाराया महाराज यांचा पालखी सोहळा आल्यानंतरचा...अगदी देहूतून निघालेले लाखो वैष्णव कडक ऊन वारा सोसत अकलूज मध्ये दाखल झाले होते आणि अकलूज मध्ये आल्यानंतर पावसांच्या सरींनी त्यांना सुखावले होते. पहिलाच पाऊस, जिल्ह्यातील पहिलेच रिंगण आणि यामुळे समस्त वातावरणच अगदी भक्तीमय झालेले. ज्ञानेश्वर माऊली तुकोबारायांच्या जयघोषाने अगदी परिसर दणाणून गेला होता. नभ बरसू लागल्याने लाखो पावलांमध्ये आता चालण्याचे बळ निर्माण झाले होते. अशा वातावरणाचा मोह आणि तुकोबारायांच्या दर्शनाची आस मनात ठेवून पायावर शस्त्रक्रिया होऊन सुध्दा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, सौभाग्यवती नंदिनीदेवी मोहिते पाटील तुकोबारायांना वंदन करण्यासाठी आले होते. अगदी गाडीतूनच हा भव्य दिव्य लाखो वैष्णवांचा सोहळा अनुभवत असताना परळी वैजीनाथ जिल्हा बीड



येथील एक ९५ वर्षाची आज्जी त्यांचे जवळ आली आणि त्यांना सांगू लागली की, अकलूजला आल्यावर एक वेगळाच आनंद या ठिकाणी मिळतो कारण आम्ही ऊस तोडी करण्यासाठी या ठिकाणी येत होतो त्या काळात शंकरराव मोहित्यांच्या मुलाच्या लग्नात आम्हीं जेवण केले होते ते लग्न किती मोठे झाले होते याचे त्या वर्णन करीत होत्या.

अगदी ट्रॅक्टरने कळया आणल्या जात होत्या आणि आम्हीं भरभरून त्या लग्नात जेवलो होतो पण आज्जीला माहित नव्हते की ज्या लग्नाच्या गप्पा गोष्टी त्या करताहेत ते हेच शंकरराव मोहित्यांचे सुपुत्र विजयसिंह मोहिते पाटील आणि त्यांच्या सुनबाई आहेत. आणि शेजारीच बसलेल्या नंदिनीदेवी मोहिते पाटील यांना देखील त्या आज्जीचे मनापासून कौतुक वाटत होते. देहू पासून चालत आलेल्या त्या आज्जीला अकलूजला आल्यावर आपल्या जीवनाशी नाळ जोडलेल्या गावात आल्यासारखे वाटत होते. त्यांच्या बोलण्यात मायेचा ओलावा होता. जुन्या आठवणींचे चित्र त्या कथन करत होत्या.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटलांचा काळ त्यांनी पाहिला होता. त्यांचे दातृत्व, नेतृत्व आणि मातृत्व त्यांनी अनुभवले होते. त्या मनमोकळयापणाने बोलत होत्या... पण नंतर त्यांना सांगण्यात आले की, आपण ज्या लग्नात जेवला ते हेच दांपत्य आहे. हेच ते शंकरराव मोहिते पाटील यांचे सुपुत्र आणि त्यांच्या सुनबाई... हे ऐकल्यावर तर त्या आज्जीला गहिवरून आले. इतक्या मोठ्या नेत्याच्या मुलाबरोबर मी बोलतेय याची जाणीव होताच त्या आज्जीच्या अंगात हत्तीचे बळ संचारले,आत्मविश्वास दुणावला आणि उत्साहित मनाने आजींच्या पावलांना बळ मिळाले. त्या लाखो वैष्णवात समरूप झाल्या पंढरीच्या दिशेने....

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# पंढरपूर नगर परिषदेच्यावतीने युद्ध पातळीवर स्वच्छता मोहिम

✔ सुराज्य/पंढरपूर

**पंढरपूर शहरामध्ये नुकतीच यात्रा संपन्न झाली या यात्रा कालावधीत अंदाजे १२ ते १५ लाख भाविक पंढरपूर मध्ये दाखल झाले आहेत .यात्रा कालावधी पूर्वी व यात्रा कालावधीनंतर भाविकांना चांगल्या सेवा सुविधा मिळाव्यात नगरपरिषद आपल्या स्तरावर योग्य ते प्रयत्न करत आहे. रस्त्यावर टाकलेल्या कचऱ्यापासून शहरात नागरिकांना व भाविकांना मोठ्या प्रमाणात दुर्गंधी चा त्रास होऊ नये म्हणून न.प. ने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले आहे. रोज जवळपास १२० टन कचरा गोळा करून त्यांची विल्हेवाट लावली जात आहे.**

मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे व प्रांत अधिकारी गजानन गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष नियोजन करून आरोग्य विभागातील सर्व सफाई कर्मचारी, मुकदम, शिपाई आरोग्य अधिकाऱ्यांना कार्यक्रम आखून दिला आहे. त्यानुसार दोन दिवसात संपूर्ण पंढरपूर शहर हे कचरा मुक्त करण्याचे प्रयत्न नगरपरिषद करत आहे. पंढरपूर शहराचे मंदिर परिसर ,संतपेठ ,स्टेशन रोड , जुनिपेठ,गोविंदपुरा , नविपेठ,इसबावी , मनिषा नगर, गणेश नगर,पालखी मार्ग व पालखी तळ असे साफसफाई साठी भाग करणेत आले आहेत. या विभागात रस्ता झाडणे, कचरा भरणे, गटारी स्वच्छता, भुयारी गटार स्वच्छता, कचरा वाहतुक, शौचालय स्वच्छतेसाठी १५०० सफाई कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत. तसेच या यात्रा कालावधीमध्ये सोलापूर महानगरपालिका, सांगोला, मंगळवेढा, बार्शी, कुर्डवाडी या

## दररोज १२० टन कचरा गोळा केला जातो



नगर परिषदेचे सफाई कर्मचारी हे सुद्धा मदत करत आहेत. शहरातील कचरा उचलणे साठी नगरपालिकेची २ डंपिंग ट्रॉल्या, २ कॉम्पॅक्टर, १ कंटेनर कॅरीअर अशी ५ वाहने

### १५०० सफाई कामगारांची नियुक्ती

स्वच्छतेच्या कामासाठी ठेकेदार पद्धतीने व कायम असे १५०० सफाई कामगारांची नियुक्ती करणेत आली आहे. या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून शहर भाग ,उपनगरे ,पत्राशेड, दर्शनबारी रस्ता, नदी वाळवंट,६५ एकर परिसर वाखरी पालखी तळ येथे स्वच्छता करण्यात येत आहे यात्रा कालावधीमध्ये आरोग्य विभागाकडील आरोग्याधिकारी, आरोग्य निरीक्षक, १० वार्ड शिपाई, मुकादम,१५०० सफाई कामगार हे दिवस-रात्र काम करीत आहेत

### सर्व भागात निर्जंतुकीकरणाचे काम सुरू

यात्रा कालावधी मध्ये शहरातील व उपनगरातील सर्व मैदाने, नदी परिसर, ६५ एकर भक्तिसागर, पत्राशेड दर्शनबारी रोजचे रोज स्वच्छ व निर्जंतुक करण्याकामी दररोज शहरात मॅलेथॉन पावडर फवारली जात आहे तसेच कचऱ्यावर व इतर घाणीचे ठिकाणी दुर्गंधीनाशक विघटनकारी बायोकल्चर ७ ब्लोअर मशिन मार्फत शहर, नदी वाळवंट, पत्राशेड,दर्शनबारी रस्ता, ६५ एकर, उपनगरे या भागात फवारण्यात येत आहे

तसेच जिल्ह्यातील आलेल्या नगर परिषदेचे १० ट्रॅक्टर , जे.सी.बी., टिपर व डंपिंग द्वारे दररोज १२० टन कचरा यात्रा कालावधीत उचलण्याचे काम युध्दपातळीवर हाती घेण्यात आले आहे तसेच घर स्तरावर कचरा गोळा करणे करीता ४१ घंटागाड्यांचा वापर करण्यात येत आहे.



## आर. जी. सेवाभावी संस्थेतर्फे वह्यांचे वाटप

✔ **सोलापूर** : आर. जी. मागासवर्गीय बहुउदेशिय सेवाभावी संस्थेच्या वतीने राजर्षी शाहु महाराज यांच्या १४९ व्या जयंतीचे औचित्य साधून रावजी सखाराम हायस्कुलमधील मुलांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणुन राजाभाऊ इंगळे, ॲड. संजीवजी सदाफुले, अजित गायकवाड, राजाभाऊ काकडे, सोमनाथ बनसोडे, ब्रह्मा निकंबे, महेश गजधाने, अमोल देंडे उपस्थित होते. यावेळी स्वाभिमानी संस्थापक पिंटू ढावरे, उस्तव अध्यक्ष आर्दश सरतापे , प्रविण गायकवाड, प्रमोद नागटिळक , संजू गायकवाड , ईलाही सय्यद, श्रीकांत सावंत, बंटी तळभंडारे, अजय गायकवाड , बबलू ढावरे , सिध्दांत रणखांबे, तुषार जौंजट , अजय कांबळे , सुधीर बनसोडे, शंशीकांत माने, विशाल गायकवाड दिंगबर वाघमारे, राजाभाऊ चव्हाण व सर्व उपस्थित होते.



## अधीक्षक अभियंता संतोष सांगळे यांची बदली

✔ **सोलापूर** : महावितरण सोलापूर मंडळ अधीक्षक अभियंता संतोष सांगळे यांची मंत्रालय, मुंबई येथे समन्वयक पदी पदस्थापना झाल्यामुळे बदली झाली. त्यानिमित्त विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या वतीने त्यांच्या सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे सोलापूर मंडळ अध्यक्ष श्री सुनील काळे, सचिव सतीश पाटील, तानाजी चटके, शुकुर शेख, विजयकुमार भावी, संजयकुमार स्वामी, दीपक ताटे, बळीराम कदम, शब्बीरअली पटेल, एम. एम. करजगीकर आदी उपस्थित होते. आपला हा सहवास माझ्यासाठी खूप आनंददायी आणि प्रेरणादायी होता. आपले ऋणानुबंध असेच अतूट राहतील अशी आशा बाळगतो, असे सांगळे यांनी सांगितले.

## सागर सिमेंटतर्फे मंगळवारी लाख वह्या वाटप



✔ **अक्कलकोट** : सागर सिमेंट लिमिटेडच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या गरीब,गरजू विद्यार्थ्यांसाठी १ लाख वही वाटपाचा कार्यक्रम मंगळवार दि. ४ जुलै रोजी सकाळी १० वाजता वृंदावन लॉन्स,जामगोंडी फंक्शन हॉल,जुळे सोलापूर येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ खासदार डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. यावेळी बसवारूढ मठाचे शिवपुत्र महास्वामीजी,तद्देवाडी चे वेदमूर्ती महांतेश हिरेमठ,सागर सिमेंटचे कार्यकारी अधिकारी सिध्दार्थ रेड्डी,सीएमओ राजेश सिंग, सोलापूर शहर पोलिस उपायुक्त विजय कबाडे,बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष दत्तात्रय मुळे यांच्या सह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे विद्यार्थी,विद्यार्थीनी,शिक्षक,पालक व इतर शहरी, ग्रामीण भागातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे,असे आवाहन सागर सिमेंटचे मुख्य व्यवस्थापक महादेव कोगनुरे यांनी केले आहे.

## शहरातील सिग्नलच्या वेळेत बदल

✔ सुराज्य/सोलापूर


उन्हाळा संपून आता पावसाळा सुरु झाल्याने शहरातील सिग्नलच्या वेळांमध्ये बदल करण्यात आला आहे. सकाळी नऊ वाजल्यापासून दुपारी एक वाजेपर्यंत सिग्नल सुरु ठेवले जातात. त्यानंतर दुपारी तीन तासांच्या विश्रांतीनंतर पुन्हा दुपारी चार ते रात्री दहा-साडेदहा वाजेपर्यंत सिग्नल सुरु राहणार आहेत. पोलिस निरीक्षक शिंगाडे व तानाजी दराडे या दोन्ही विभागाअंतर्गत येणाऱ्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवत आहेत. दरम्यान, आता उन्हाळा संपल्याने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील सिग्नलच्या वेळा बदलल्या असून वाहनचालकांनी त्याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत १४ ते १६ सिग्नल सुरु असून त्यातील आवश्यकता नसलेले सिग्नल काही ठरावीक वेळेनंतर बंद ठेवले जातात. महापालिकेशी केलेल्या पत्रव्यवहारानंतर आगामी काळात शहरातील सिव्हिल चौक, विजापूर रोड अशा भागात आणखी सिग्नल वाढणार आहोत, सहायक पोलीस आयुक्त अजय परमार यांनी सांगितले.

## पालखी सोहळ्यात चांगले काम केल्याबद्दल सरपंचासह कर्मचाऱ्यांचा सन्मान

✔ सुराज्य/वेळापूर

वेळापूर ग्रामपंचायतीन पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी उत्तम व्यवस्था केल्याबद्दल राष्ट्रवादीचे नेते उत्तम जानकर यांच्या हस्ते सरपंच, उपसरपंच यांच्यासह कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना कोणत्याही उणिवा भासू नयेत, त्यांचे चांगले स्वागत व्हावे, त्यासाठी वेळापूर ग्रामपंचायतीने मुरमीकरण, लाईट व्यवस्था, काटेरी झाडे, पाण्याची व्यवस्था, औषध फवारणी, गटारीवस्था, वेळापूर गाव स्वच्छता इत्यादी सर्व कामे सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी चव्हाण, ग्राम विकास अधिकारी पांडुरंग ठवरे, यांच्या नेतृत्वाखाली प्रकारे काम केले. सोहळ्याचा मुक्काम आटपून सकाळी पालखी सोहळा पुढे गेल्यानंतर वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे यांनी स्वतः



कर्मचारी, विद्यार्थी यांच्या समवेत कचरा गोळा करून स्वच्छता केली. त्याबद्दल सर्वांचा वेळापूर गरुड बंगला येथे उत्तमराव जानकर यांच्या वतीने सर्वांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला माजी संचालक दादासाहेब घाडगे, रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, काशिनाथ आडत, पोपट जानकर, मोहन कचरे, धानोरे माजी सरपंच जीवन जानकर, ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब मुंगूसकर, हनुमंत वायदंडे, विनायक माने, महादेव म्हेत्रे, चंद्रकांत पोळ, संजय देशपांडे, शिवाजी सावंत, बाबासाहेब माने, जवान माने देशमुख, अमोल पनासे, आप्पा कांबळे, शंकर आडत, रामा शेंडगे, राजेंद्र चव्हाण, खोखो प्रशिक्षक वैभव बनसोडे, रणजीत सरवदे, गजानन माने, दत्ता जानकर यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## गोवंशीय प्राण्याची कत्तल; दोघांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : गोवंशीय प्राण्याची कत्तल केल्याप्रकरणी दोघाजणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३० जून रोजी दुपारी दक्षिण शोभादेवी नगर मजरेवाडी येथे घडली. याप्रकरणी पो. कॉ. रामचंद्र माने यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अबुबकर ऊर्फ बॉस अब्दुलकादिर कुरेशी (वय-२९) व इब्राहिम सिद्दकी कुरेशी (वय-२८,रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.संशयित आरोपी अबुबकर याच्या घरात गोवंशीय सदृश्य जनावरांचे कापलेले मास होते. खात्री झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. तपास सहायक पोलीस निरीक्षक सोळुंके हे करीत आहेत.

## वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

✔ सुराज्य/सोलापूर

कोल्हापूर परिक्षेत्रामधील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. बदल्या केल्याचा आदेश विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांच्या सहीने काढण्यात आले आहेत.

या बदल्यामध्ये सोलापूर ग्रामीण सांगली, सातारा, पुणे ग्रामीण व कोल्हापूर जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्याचा समावेश आहे.विहित कालावधी पूर्ण केलेल्या २३, विनंतीनुसार ४ जणांची बदली करण्यात आली आहे.याशिवाय ५ पोलीस निरीक्षकांची बदली विशेष पोलीस महानिरीक्षकांनी अमान्य केली आहे.बदल्यामध्ये सोलापूर ग्रामीणचे तीन, कोल्हापूरचे आठ, साताराचे तीन,पुणे ग्रामीणचे सात,सांगलीचे पाच पोलीस निरीक्षकांचा समावेश आहे. परिक्षेत्र स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळाच्या मान्यतेने या बदल्या करण्यात आल्याचे सांगण्यात आले.दरम्यान, संबंधित घटक प्रमुखांनी या बदली आदेशाची प्रत संबंधित पोलीस निरीक्षक यांना तात्काळ बजावून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. शिवाय पर्यायी व बदलीवर येणाऱ्या पोलीस निरीक्षकांची वाट पाहू नये असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## सुराज्य चे पत्रकार धनशेट्टी अन्नछत्र मंडळातर्फे सन्मानित

✔ सुराज्य/अक्कलकोट

धार्मिक व सामाजिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणाऱ्या अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने हालहळ्ळी (अ) चे सुपुत्र, दैनिक सुराज्याचे तालुका प्रतिनिधी पत्रकार रविकांत धनशेट्टी यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त



अमोलराजे भोसले यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा पार पडला.

शुक्रवारी सायंकाळी ७ वा. चला हवा येऊ द्या फेम रंग विनोदाचे, रंग सुरांचे' सादरकर्ते - श्रेया बुगडे, भाऊ कदम, कुशल बद्रिके, मेघना एरंडे व गायक- स्वप्नील गोडबोले, योगिता गोडबोले आणि सहकारी मुंबई ह्या कार्यक्रमाने ८ वे पुष्प संपन्न झाले.या कार्यक्रमात हा सन्मान झाला. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, सोलापूरचे धर्मादाय उपायुक्त सुनिता कंकणवाडी, जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अॅड. नितीन हबीब, श्री देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, संदीप फुगे-पाटील, डॉ. श्रद्धा जंज्वाळ, अभियंता राजेश निलवाणी, कॉंग्रेस शहर अध्यक्ष रईस टीनवाला, स्टेट बँकचे क्षेत्रीय प्रबंधक निशांतकुमार जयस्वाल, नगर रचना विभागाचे नारायणराव जोशी, सुनील देशपांडे व श्रीमती मल्लम्मा पसारे, समीर लोंढे यांच्यासह तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## गुरूस्थान वटवृक्ष मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव

✔ सुराज्य/अक्कलकोट

गुरूस्थान वटवृक्ष मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव सोमवारी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. गुरुपौर्णिमेच्या या महतीमुळेच या दिवशी प्रचंड मोठया संख्येने स्वामींच्या दर्शनाकरीता पहाटे ४ वाजल्यापासूनच भाविक गर्दी करतात, अशी माहिती मंदीर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली.



यंदाचा गुरुपौर्णिमा उत्सव सोमवार दि.३ जुलै रोजी आहे. या दिवशी येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील नित्यनियमाने होणारी काकड आरती पहाटे ५ वाजता होईल. भक्तांना विशेष दर्शन रांगेची सोय करण्यात आली आहे. गर्दीमुळे सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होणेकरिता स्वामी भक्तांचे नित्य नियमाने होणारे अभिषेक होणार नाहीत. या दिवशी जे स्वामी भक्त अभिषेकाची पावती करतील त्यांना प्रसाद मिळेल. दुपारी ११:३० वाजता चोळप्पा महाराजांचे वंशज पुरोहीत मोहनराव पुजारी, मंदार महाराज पुजारी यांच्या हस्ते मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रींना महानैवेद्य दाखवून नैवेद्य आरती होईल व शेजारती रात्री ७:४५ ते ८:४५ यावेळेत होईल. गुरूपौर्णिमेनिमित्त दुपारी १२ ते ३ या वेळेत देवस्थानच्या वतीने मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील भक्त निवास येथे सर्व स्वामी भक्तांसाठी भोजन महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे. .

## विनायकराव पाटील यांना अटकपूर्वक जामीन मंजूर

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

माढा तालुक्याचे माजी आमदार पांडुरंग उर्फ विनायकराव पाटील यांना बार्शी येथील सत्र न्यायालयाने फसवणुकीच्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मंजूर केला. ॲड. ज्ञानेश्वर मोरे, पुणे यांचे मार्फत त्यांनी जामीनासाठी अर्ज केला होता.

पाटील हे माढा तालुका शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष आहेत. या संस्थेमध्ये सचिव पदावरून तसेच प्राचार्य पद भरती वरून आजी-माजी पदाधिकाऱ्यांमध्ये वाद सुरू आहेत. एका बाजूस संस्थेचे पूर्व सचिव शामसुंदर भिसे यांनी संस्थेच्या विश्वस्त मंडळाबाबत मंजूर करून घेतलेल्या बदल अहवालास पाटील यांनी केलेल्या अपिलावरून धर्मादाय सहआयुक्त पुणे विभाग यांनी स्थगिती दिली आहे. तर दुसरीकडे संस्थेने औदुंबर पाटील यांना सचिव नेमून विश्वस्त मंडळाची नवीन यादी मंजुरी करीता धर्मादाय उपायुक्त, सोलापूर यांचेकडे सादर केली आहे. या प्रकरणात शामसुंदर भिसे आणि औदुंबर पाटील यांनी सादर केलेल्या विश्वस्त मंडळाच्या दोन्ही याद्यांमध्ये अध्यक्ष म्हणून पाटील यांचीच नेमणूक केली आहे. रिक्त झालेले प्राचार्य पद भरण्याकरिता शैक्षणिक विभागाकडे ऑनलाइन पोर्टल द्वारे प्रस्ताव पाठवताना खोटी कागदपत्रे सादर करून संस्थेची फसवणूक केल्याचा आरोप करून राजाभाऊ सुसलादे यांनी कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. वकिलांच्या युक्तीवादानंतर पाटील यांना अटकपूर्वक जामीन मंजूर करण्यात आला. आरोपींच्या वतीने ॲड. ज्ञानेश्वर मोरे यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरत सत्र न्यायाधीश जे.सी. जगदाळे यांनी जामीन अर्ज मंजूर केला. अर्जदाराच्या वतीने ॲड. ज्ञानेश्वर मोरे, ॲड संभाजी गलांडे, ॲड. विजय सुर्वे यांनी काम पाहिले.

## पार्वतीबाई झळकी यांचे निधन



✔ **सोलापूर** : शेगांव (ता. अक्कलकोट) येथील रहिवासी पार्वतीबाई शरणप्पा झळकी (वय ७५) यांचे शनिवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## केशव पुकळे यांचे निधन



✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील केशव नामदेव पुकळे (वय ६०) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,दोन मुली, सुना, नातवंडे , जावई असा परिवार आहे.

## विणकर बागेत ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने विणकर बागेत ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारण्यात आले असून त्याचे उद्घाटन आमदार विजयकुमार देशमुख मालक यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याअनुषंगाने सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा व नगर पंचायतीकडे उपलब्ध असलेल्या इमारतीमध्ये स्वनिधीतून विरंगुळा केंद्रे तातडीने सुरु करावेत व तेथे वाचनालय, विविध बैठे खेळ तसेच इनडोअर खेळ आणि अन्य करमणुकीच्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत उप सचिव महाराष्ट्र शासनाकडून कळविण्यात



### महापालिकेचा उपक्रम: आ. देशमुखांच्या हस्ते उद्घाटन

आलेले आहे. त्यानुसार या विणकर बागेत विरंगुळे केंद्र सुरू करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नागरिक शहद मैंदर्गी, सिद्धाराम कोंडे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपअभियंता किशोर सातपुते, झाकीर हुसेन नाईकवाडी किशोर तळीकडे ,गणेश गुज्जा,श्री भूतडा, माजी नगरसेवक अमर पुदाले, माजी नगरसेविका सोनाली मूटकरी, जिलानी सगरी,सतीश महाले, आनंद बिरू आदी मान्यवर उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारण्यात आले आले असून .

### लुडोगेमसह विविध सुविधा उपलब्ध

या केंद्रामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी वाचण्यासंदर्भात वर्तमानपत्र, कॅरम, बुद्धिबळ, लुडो गेम विविध बैठक खेळ, इनडोर खेळ अन्य करमणुकीचे सुविधा या ठिकाणी उपलब्ध करण्यात आले आहे. हे केंद्र सकाळी सहा ते नऊ व सायंकाळी चार ते आठ वाजेपर्यंत ज्येष्ठ नागरिकांसाठी खुले ठेवण्यात येणार आहे. तरी ज्येष्ठ नागरिकानी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार विजयकुमार देशमुख यांनी केले.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांना जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि।। व सब डि।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील साखर पेठ येथील सि. स. नं. ९८५७ यांसी म्युनिसिपल घर नं. १५१ याचे प्रत्यक्ष जागेवरील क्षेत्र ११०२ चौरस फूट अथवा १०२.४१ चौरस मीटर आणि उताऱ्यावरील क्षेत्राप्रमाणे ५१.८० चौ. मी. अथवा ५५७.३६ चौरस फूट इतकी आहे. सदर जागेतील उत्तरेकडील भिंत सोडून बाकीच्या तीन भिंती स्वतंत्र मालकीच्या आहेत. यांसी चतु:सिमा :- पुर्वेस- सि. स. नं. ९८४६, उत्तरेस- सि. स. नं. ९८५८, पश्चिमेस- सि. स. नं. ९८५६ व ९८५९, दक्षिणेस - सि. स. नं. ९८४६ असे आहे.

वर नमूद मिळकत ही श्री. भागण्णा दुर्गप्पा कंची यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. सदर वर नमूद मिळकत ही आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवले आहे.

वर नमूद मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, अशी मिळकत मालकांनी आमचे अशिलांना खात्री व भरवसा दिले आहे. तरी परंतु वरील मिळकतीबाबत कोणाचा गहाण, दान, लिज, टाच, बक्षीस पत्र, साठेखत, खरेदीखत, नोटरी करार-मदार, इसारा पावती, कब्जा साठेखत, पोटगी, कोर्ट केस, बँक कर्ज बोजा, तसेच सहकारी संस्था वगैरे कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाचे आत लेखी कागदपत्राचे पुराव्यानिशी खालील नमुद पत्त्यावर येवून आमचे अशिलाची खात्री करून द्यावी.

मुदतीत कुणाचीही तक्रार व हरकत न आल्यास सदर तिन्ही मिळकती ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मग तद्नंतर सदर वर नमुद मिळकतीबाबत व मालकीबाबत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत व तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता. ३०/६/२०२३.

सही/-
ॲड.आर.डी. शेरला
B.Com LL.B G D C & A LL.M
४अ, यशवंत हौसिंग सोसायटी,
स्वागत नगर रोड, कुमठा नाका, सोलापूर.
मो.नं.९६०४७८३१३०, अशिलातर्फे ॲडव्होकेट

# कुर्डूवाडी रेल्वे स्टेशन, बस स्थानकावर परतीच्या प्रवासासाठी वारकऱ्यांची गर्दी

## रेल्वे पोलीस, आरपीएफ जवानांचा चोख बंदोबस्त

सुराज्य/कुर्डूवाडी

**आषाढी एकादशीला पांडुरंगाचे दर्शन करून आपल्या गावाकडे परतण्यासाठी निघालेल्या वारकऱ्यांनी कुर्डूवाडी रेल्वे स्थानक व बस स्थानकावर वारकऱ्यांनी गर्दी केली होती. या वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी रेल्वे पोलीस, रेल्वे सुरक्षा बल (आर. पी. एफ.) जवान, होमगार्ड व नागरी सुरक्षा पथक आदींनी सहकार्य व सुरक्षा करीत आहेत. तर स्थानकावर प्राथमिक उपचार पथक तैनात करण्यात आले होते. यामुळे वारकऱ्यांचे सुखकर प्रवास झाला.**



यावर्षी पावसाला उशिरा सुरुवात होऊन सुद्धा पंढरपूरच्या आषाढ वारी यात्रेकरीता सुमारे दहा ते बारा लाख वारकरी पंढरीत आले होते. दरवर्षी आषाढी यात्रेच्या सोहळ्याची सांगता पौर्णिमेला गोपाळ काल्यानंतर निघत असते. मात्र कोरोना नंतर मागील वर्षापासून वरकरी लवकरच परतीच्या प्रवासाला निघाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यंदाही भाविक परतीच्या प्रवासाला निघाले आहेत. आपल्या गावापर्यंत रेल्वे जात असल्यामुळे कुर्डूवाडी रेल्वे स्थानकावर वारकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. स्थानकावर वेळोवेळी ध्वनी क्षेपणावरून स्पेशल रेल्वेचे महिती व सूचना सांगत असल्यामुळे प्रवाशांची धावपळ झाली नाही. मात्र पंढरपूर रेल्वे स्थानकावरूनच रेल्वे हाऊसफुल्ल होऊन येत होत्या. यामुळे मिळेल त्या ठिकाणी वारकरी दाटीवाटीत व उभे राहून आपल्या गावा पर्यंत प्रवास करावा लागत आहे. या परतीच्या प्रवासातील वारकऱ्यांची गर्दी पाहता रेल्वेची संख्या वाढवण्याची गरज असल्याचे वारकऱ्यातून बोलले जात होते.

या रेल्वे स्थानकावरील वारकऱ्यांना सुविधा व रेल्वेच्या माहिती व सुरक्षेसाठी रेल्वे पोलीस व रेल्वे सुरक्षा बल आरपीएफ होमगार्ड व नागरी सुरक्षा पथक नेमण्यात आल्यामुळे यांच्या सतर्कतेमुळे कोणतीही दुर्घटना घडली नाही. यामुळे वारकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत असल्याचे दिसून आले.



### ४ जुलै रोजी गजानन महाराजांची पालखी कुर्डूवाडीत

पंढरपूर मधील गोपाळकाला झाल्यानंतर श्री गजानन महाराजांची दिंडी परतीच्या प्रवासाला निघते. दि.४ जुलै रोजी कुर्डूवाडी शहरातील गोल काडादी चाळमध्ये गजानन महाराजांची पालखी मुक्कामी येणार आहे. या पालखीच्या आगमनाची उत्सुकता लागली असून स्वागताची जोरदार तयारी सुरू केली आहे.

### कुर्डूवाडी आगारात बसच्या रांगा

पंढरपूरहुन मराठवाडा, विदर्भाकडे निघालेल्या स्पेशल एसटी बसमध्ये कुर्डुवाडी आगारात डिझेल भरण्यासाठी मोठ्या रांगा लागल्याचे दिसून आले. या बसच्या लांबच्या लांब रांगा लागल्यामुळे वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून कुर्डूवाडी बस स्थानकाचे आगारप्रमुख प्रसाद कुलकर्णी यांनी आपला कर्मचाऱ्यांनी वाहतूक सुरळीत केली व बसमध्ये डिझेल भरून आपल्या मार्गावर मार्गस्थ केल्या तसेच खाजगी वाहनाने गावाकडे जाण्याची वाहनांची संख्या मोठी होती. यामुळे कुर्डूवाडी, बार्शी व पंढरपूर रोडवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे दिसत होती.



## कोंडी ते अकोलेकाटी रस्त्याच्या कामाची चौकशीची मागणी

**उ. सोलापूर** : सोलापूर कोंडी ते अकोलेकाटी १० कि.मी. चा रस्ता काही तासात निकृष्ट पद्धतीने केला आहे.शासनाच्या नियमानुसार साईड पट्टी न ठेवता केला असून या रस्त्याची पाहणी करून ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी जाणता राजा बहुद्देशीय शिक्षण मंडळाच्या वतीने गणेश निळं यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना कार्यकारी अभियंता परदेशी यांना निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख शिवाजी नीळ यांची प्रमुख उपस्थिती होती. शेतकरी, ग्रामस्थ ,विद्यार्थी याच रस्त्यावरून ये - जा करत असतात. ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या संगनमताने रस्त्याचे काम निकृष्ट पध्दतीने झाले आहे.साईड पट्टी नसल्यामुळे विद्यार्थ्यांना, ग्रामस्थांना जीव मुठीत धरून चालत जावे लागत आहे. कार्यवाही, कारवाई न झाल्यास सर्व पालक,स्थानिक रहिवासी, शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.



## ज्ञानगंगा प्रशालेत आषाढीनिमित्त बालदिंडी

**सोलापूर** : उन्नती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दहिटणे येथील ज्ञानगंगा प्रशालेत आषाढी वारी निमित्त प्रशालेच्यावतीने गावांमधून वारी व ग्रंथ दिंडी काढण्यात आली व तसेच विद्यार्थ्यांकडून विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांमधून विठ्ठल रुक्माई व इतर संतांची वेशभूषा साकारण्यात आली. याप्रसंगी विविध ठिकाणी भजन भारुड आदी कार्यक्रम सादर करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रशालेचे माजी मुख्याध्यापक जाधव तसेच प्रताप पाटील आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक सुरवसे, सहशिक्षक मोरे, खरात, मुंडे , शेख, सहशिक्षिका पाटील, निंबाळकर , नेत्रे , बाळ पाटील, बाळू नारायणकर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता गावातील विठ्ठल रुक्माई मंदिरात करण्यात आली. याप्रसंगी प्रशालेतील सर्व विद्यार्थी शिक्षक व गावकरी उपस्थित होते.



## शिक्षकाने स्वखर्चातून बसवली बायोमेट्रिक मशीन

**नातेपुते** : नातेपुते एज्युकेशन सोसायटी संचलित प्राथमिक विभागांमध्ये तिसरीचे वर्गशिक्षक अभिजीत वाळके यांनी स्वखर्चातून विद्यार्थी हजरीसाठी बायोमेट्रिक मशीन बसविली. सोलापूर जिल्ह्यात हा इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक पद्धतीवर हजरी घेण्याचा पहिलाच प्रयोग आहे. बायोमेट्रिक पद्धतीवर हजेरी देताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे कुतूहल मनाला खूप समाधान देत होते असे वर्गशिक्षक अभिजीत वाळके यांनी सांगितले. यावेळी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक कूडलिक इंगळे, ज्येष्ठ शिक्षकं संजय जाधव,दादासाहेब देवकाते मनोज पवार, रवी ननवरे, मारूती भांगरे , सुनिल कदम, इंगोले, किशोर,भरते, संतोष वाघमोडे , सागर बरडकर, विनायक चांगन हे सर्व उपस्थित होते.

## अर्चना वेदपाठक या सेट परीक्षा उत्तीर्ण



**कुर्डूवाडी** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या मार्च-२०२३ सेट परीक्षेमध्ये इंग्रजी या विषयात अर्चना शिरीषकुमार महामुनी- वेदपाठक यांनी पहिल्याच प्रयत्नात सेट परीक्षेमध्ये यश मिळवले आहे. त्या कडा( जि.बीड)येथे बीए झाल्या. पुढे लग्नानंतर त्यांनी महिला अध्यापक विद्यालय बीड येथून ब एड्चे शिक्षण पूर्ण केले आणि शिवाजी महाविद्यालय बार्शी येथून त्या पदव्युत्तर एम. ए .परीक्षा उत्तीर्ण झाल्या. सध्या नूतन इंग्लिश मेडियम स्कूल,कुर्डुवाडी येथे त्या कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## गुरूपौर्णिमेनिमित्त उद्या अन्नछत्र मंडळातर्फे धार्मिक कार्यक्रम

सुराज्य/अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने सोमवार दिनांक ३ जुलै रोजी गुरूपौर्णिमेनिमित्त सकाळी ७ ते ९ श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण, सकाळी ९ ते १० नामस्मरण, जप व श्री गुरूपूजा, सकाळी १० वाजता महानवैद्य सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, संजय शिंदे (पालखी संयोजक लांजा), अशोक बांदल (देणगीदार, खेड शिवापूर, पुणे) यांच्या हस्ते होणार असल्याचे माहिती न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी दिले.

सकाळी १०.३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद, दु. ४ वाजता श्री स्वामी समर्थांच्या पादुका पालखी, आणि न्यासाच्या सुशोभित केलेल्या रथाच्या मिरवणूकीचा दिंड्या व वाद्यांचा गजरात अतुल बेहरे पुणे यांच्या नांदब्रह्म या ढोलपथकाच्या तालात आणि अमोलराजे लेझिम संघाच्या शानदार खेळाने शुभारंभ पुणेचे उद्योगपती विशाल गोखले, श्री शंकर महाराज मठ, पुणे विश्वस्त व ग्रँव्हीटी ग्रुपचे चेअरमन मिहीर कुलकर्णी, जगन्नात उर्फ अण्णा थोरात -अध्यक्ष अखिल मंडई मंडळ पुणे, बाळासाहेब दाभेकर -अध्यक्ष भरत मित्र मंडळ पुणे, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजीराजे पवार, सो.म.पा. नगरसेवक व शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, संकेत पिसे यांच्या हस्ते पालखी व रथ मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

### पालकमंत्र्यांची राहणार उपस्थिती



गुरुपोर्णिमे निमित्त लाखो स्वामी भक्तांकरिता अन्नछत्र मंडळ सज्ज असून, उभी स्वामींची मुर्ती, महाप्रसादगृह, कपिला गाय, कारंजा, शिवस्मारक, वाटिका व बालोउद्यान, शिवचरित्र धातू शिल्प प्रर्दशन हे पाहण्यासाठी स्वामी भक्तांची मोठी सोय करण्यात आली आहे. यात्री निवास, यात्री भुवन, प्रशस्त वहानतळ स्वामी भक्तांनी गजबजलेले व फुलून गेले आहे. दरम्यान दि. १ जुलै ते ३ जुलैपर्यंत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे. न्यासाकडून अग्निशामक व रुग्णवाहिकेचा देखील उत्तम सोय केलेली आहे. न्यासाला देणगीदारास आयकरात ८० - जी कलमान्वे सवलत आहे.

## स्वेरीच्या वेदांगी भुजंग यांची पैरंट पे’ कंपनीत निवड

**पंढरपूर** :पैरंट पे’ या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील वेदांगी मंगेश भुजंग यांची कॅम्पस इंटरव्ह्यू मधून निवड करण्यात आली आहे.’ अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली. तिला वार्षिक रु. ४ लाख इतके पॅकेज मिळाले आहे. तिचे संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या वेदांगी भुजंग यांचे अभिनंदन केले.

## शाहू महाराज हे लोक कल्याणकारी व आदर्श राजे होते : भालशंकर

सुराज्य/मोहोळ

आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या राज्यात शेतकरी महिला, कष्टकरी , कामगारांसाठी विकासात्मक धाडसी व क्रांतीकारी निर्णय घेतले. अनिष्ठ रुढी परंपरा बंद केल्या, असे प्रतिपादन बहुजन शिक्षक महासंघाचे प्रदेश अध्यक्ष आण्णासाहेब भालशंकर यानी मोहोळ येथे बोलतांना केले . मोहोळ येथील बहुजन शिक्षक महासंघ मोहोळ शाखा व पंचशील मित्र मंडळाच्या वतीने कै. शहाजीराव पाटील सभागृहात छत्रपती शाहू महाराज यांची १४९ वी जयंती साजरी करण्यात आली, त्यावेळी भालशंकर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. प्रा.संभाजी मोटे अध्यक्षस्थानी होते. या वेळी नगरसेवक सुशील क्षीरसागर, महासंघाचे राज्य संघटक प्रा. अशोक पाचकुडवे, जिल्हा आध्यक्ष युवराज भोसले, पंचशील मंडळाचे अध्यक्ष शशीकांत ठोकळे , मुख्याध्यापक दिनेश नरळे, रजनी कांबळे, प्रवीण डोके, अॅड प्रेमनाथ सोनवणे, अॅड आकाश कापुरे, संजय आठवले , संदीप सोनवणे, हारिष सरवदे , विजय लोंढे , आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी १० वी व १२ वी परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रा. अशोक पाचकुडवे यांनी प्रास्ताविक तर सुनील गायकवाड यानी सूत्र संचालन केले तर संजय आठवले यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी आण्णा गवळी , शिवाजी आवारे, संदीप निरस्ताने , सुनील ससाणे, सदा कोळी आदींनी परिश्रम घेतले.

## डॉ रवींद्र शाह यांचे निधन



सुराज्य/सोलापूर

येथील प्रसिद्ध फिजीशियन डॉ रवींद्र सतीशचंद्र शाह यांचे शनिवारी पहाटे ३.३० च्या सुमारास पुणे येथील खासगी रुग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षाचे होते. गेली अनेक वर्ष ते अनेक खासगी रुग्णालयाशी सलग्न होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ असा परिवार आहे. नवभारत मोटर्सचे राजेंद्र गांधी व नवभारत गॅस चे पंकज शाह यांचे ते भाऊ होत. त्यांची अंतयात्रा रविवार सायंकाळी ५ वाजता रेल्वे लाईन्स येथील त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे.

## अकलूज येथे भाजपतर्फे लाभार्थी संमेलन उत्साहात

सुराज्य/अकलूज



भाजपतर्फे माळशिरस तालुका व माढा विधानसभा मतदारसंघातील माळशिरस तालुक्यातील येणारी गावातील लाभार्थी संमेलन अकलूज येथे उत्साहात पार पडले याप्रसंगी आ. रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी विविध योजनांची माहिती देत कार्यकर्त्यांनी बूथ स्तरावर सक्षमपणे काम करावे असे आवाहन केले.

अकलूज येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने कृष्णप्रिया हॉलमध्ये लाभार्थी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अर्जुनसिंह मोहिते पाटील, राजकुमार पाटील, प्रकाशराव पाटील,बाबाराजे देशमुख, ज्येष्ठ नेते गणपतराव वाघमोडे,रामचंद्र सावंत पाटील, रावसाहेब पराडे पाटील,अॅड. मिलिंद कुलकर्णी, कल्पना कुलकर्णी, प्रतापराव पाटील, बाळासाहेब सरगर, मामासाहेब पांढरे, दत्तात्रय भिलारे, संदीप घाडगे, सुरज मस्के आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी माळशिरस तालुकाध्यक्ष बाजीराव काटकर यांनी महाजनसंपर्क अभियानाची परिपूर्ण माहिती सांगितली. मोदी सरकारने राबविलेल्या विविध योजना तळागाळात रुजत आहेत अनेक लाभार्थी याचा लाभ घेत आहेत म्हणूनच हे लाभार्थी संमेलन आयोजित केले असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत असंख्य कार्यकर्त्यांनी सरल अॅप डाऊनलोड करून भाजपाची सदस्य नोंदणी करून घेतली. या लाभार्थी संमेलनामध्ये आमदार मोहिते पाटील यांनी गेल्या नऊ वर्षात देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या कार्याचा आढावा सांगितला. या बैठकीत भाजपा कार्यकर्त्यांच्या कार्याचा आढावा त्यांनी यावेळी घेतला. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सुरू असलेले उपक्रम केंद्र आणि राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी राबवलेल्या विविध कार्यक्रमाबाबत यावेळी चर्चा झाली.



## कुर्डूवाडीत पाणीपुरवठा समस्येबाबत भाजपाचे उपोषण

सुराज्य/कुर्डूवाडी

शहरातील नागरीकांच्या पाण्याच्या प्रश्नासंदर्भात दि.३० जून रोजी, नगरपरिषदेच्या आवारात भारतीय जनता पार्टीच्या वतीने, एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते. पाणी पुरवठा विभागाचे अतुल शिंदे,कोमल वावरे, आस्थापना विभाग प्रमुख रविंद्र भांबुरे यांचेसमवेत पक्षाचे पदाधिकारी व नागरीक यांच्यात चर्चा झाली. यावेळी माढा तालुका भाजप युवा मंच अध्यक्ष उमेश पाटील, शंकर बागल, प्रतिक्षा गोफणे, युवक सुधीर गाडेकर,निलोफर शेख, विद्या रणदिवे, बालाजी गायकवाड,सचिन गायकवाड,लक्ष्मण कांबळे,शार्दुल दातार, जयश्री कारंजकर,रेश्मा जाधव,स्वाती गोरे,पद्मावती दातार,आरती गाडेकर, अंजना कांबळे,वासंती गवळी,सुवर्णा तरंगे,विमल सरवदे,ज्योतीराम जाधव,विनायक कारंजकर, सुहास सरडे, कृष्णा खंडेलवाल, विजय शेंडगे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहर व जिल्ह्यात खो-खो दिन उत्साहात

सुराज्य/सोलापूर

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खो खो दिन शहर व जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला. दक्षिण सोलापुर तालुका खो खो संघटनेकडून सोलापुर म्युचर खो खो संघटनेचे अध्यक्ष महेश गादेकर यांची अध्यक्षपदी फेरनिवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. मंद्रूप येथील न्यू गोल्डन क्लबच्या वतीने सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र मांडे यांच्या हस्ते मैदानाचे पूजन करण्यात आले. यावेळी संतोष कोरे यांनी खेळाडूना मार्गदर्शन केले

न्यू सोलापूर क्लबच्या वतीने वृक्षारोपण



न्यू सोलापूर क्लबच्या वतीने शासकिय मैदान नेहरूनगर येथे वृक्षारोपण न्यू जॉगर्स फाउंडेशनचे उपाध्यक्ष शशिकांत कोळेकर सोमा कोळेकर, योगेश जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी न्यू सोलापूर क्लबचे संस्थापक मनोज संगावार, जगन्नाथ व्यवहारे, रमेश बसाटे, सुरेश भोसले, प्रियवंदा पवार, गोकुळ कांबळे, युसुफ शेख, रवी मैनावाले, संतोष कदम, खोखो असोसिएशनचे सहसचिव मोहन रजपूत आदी उपस्थित होते.

**अंत्रोळी जि.प.शाळेत खेळाडूंचा सत्कार**

अंत्रोळी येथील जिल्हा परिषद शाळेत राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत यश संपादन केलेल्या खेळाडूंचा सत्कार स्वामी विवेकानंद व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अंबादास पांढरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सिध्दाराम बिराजदार, मजनुद्दीन पठाण, नाथाजी केंगार, मुख्याध्यापक सिद्धारूढ मुंदनकेरी, प्रमोद झेंडे, चंद्रकांत कोकरे, दावल शेख, नबीलाल शेख, गोविंद कोळी, नामदेव सुपेकर, सागर कर्वे, राजकुमार कोळी, विक्रम जाधव, रंगा पुजारी आदी उपस्थित होते.

**सांगोला विद्यामंदिर प्रशालेत मैदानाचे पूजन**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज सांगोला येथे उद्योगपती प्रमोद म्हमाणे यांच्या हस्ते खो- खो मैदानाचे पूजन करण्यात आले. यावेळी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म.शं घोंगडे, प्राचार्य गंगाधर घोंगडे, उपमुख्याध्यापक लक्ष्मण विधाते, उपप्राचार्य शाहिदा सय्यद, पर्यवेक्षक पोपट केदार, प्रा. डी. के. पाटील आदी उपस्थित होते.

**जि.प. शाळा इंगळगी**

जि.प. शाळा इंगळगीत सरपंच श्री वळसंगे यांच्या हस्ते खोखो मैदानाचे पूजन करण्यात आले. श्रीरंग बनसोडे यांनी खोखो या खेळाची माहीती सांगितली.

# समाजातील सर्व घटकांना न्याय देण्यासाठी पुन्हा मोदींना निवडून द्या

## ▶ प्रदेशबुद्धिवंतांच्या संमेलनात उपाध्यक्ष माधव भंडारी यांचे आवाहन

✔ सुराज्य/सोलापूर

**शेवटच्या घटकापर्यंत विकास संमेलन पोहोचविण्याच्या हेतूने भाजप राजकारण करत असून मतांची भीती कधीच भाजपला नाही. गरिबांचे हित जोपासण्यातच भाजपा धन्यता मानत आह. समाजातील सर्व घटकांना न्याय देण्यासाठी २०२४ लाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवडून द्यावे, असे आवाहन भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांनी केले.**



दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाच्यावतीने सोलापुरात झालेल्या बुद्धिवंतांच्या संमेलनात ते बोलत होते. यावेळी खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, आ. सुभाष देशमुख, संयोजक नरेंद्र काटीकर, दक्षिण सोलापूर विधानसभाप्रमुख हणमंत कुलकर्णी, भाजप प्रदेशचे विशेष निमंत्रित मनिष देशमुख, महिला आघाडीच्या अध्यक्षा दीपाली व्हनमाने, जिल्हा परिषदेचे माजी पक्षनेते अण्णाराव बाराचारे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांनी केले. संमेलनाचा उद्देश संयोजक प्रा. नरेंद्र काटीकर यांनी मांडला.

मोदींच्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात आणि कोरोना महामारीचा भारताच्या अर्थकारणावर कोणताच परिणाम झाला नाही. जनधन खात्याच्या माध्यमातून मोदींनी सर्वसामान्य नागरिकांना बँकेत उभे राहण्यासाठी जागा दिली. यामुळे ४८ कोटी खाती बँकेत उघडली गेली. यातून पावणेतीन लाख कोटी रुपये बँकेत जमा झाल्याचे भंडारी यांनी सांगितले. २०२४ ला पुन्हा मोदींना साथ द्या, असे आवाहन भंडारी यांनी केले.

नऊ वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबविलेल्या योजनांची माहिती देत खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांनी गरिबांच्या जीवनावर सकारात्मक झालेल्या बदलाची माहिती दिली. आ. सुभाष देशमुख यांनी नरेंद्र मोदी यांच्यामुळे भारत महासत्ता होण्याबरोबर जगाला आपली ताकद दाखवत असल्याचे सांगत मोदींना पुन्हा एकदा निवडून देण्याचे आवाहन केले.

भाजपला गरिबांचे हित महत्त्वाचे असल्याने माजी आ. नरसय्या आडम यांच्या कार्याला भाजपने प्रोत्साहन देत असंघटित कामगारांच्या ३० हजार घरांच्या प्रकल्पाला मदत केली. यात राजकारणाचा विषय बाजूला ठेवत केवळ समाजहित बघण्यात आले, असे खा. महास्वामी यांनी सांगितले.



## छत्रपती शाहूंच्या जयंतीनिमित्त विमल शाळेत विविध उपक्रम

✔ **सोलापूर :** छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त भिमप्रेमी प्रतिष्ठानच्यावतीने विमल कन्या प्रशाला, सोलापूर येथे मुलींसाठी स्वयंरक्षणासाठी मोफत कराटे प्रशिक्षण शिबीर, मुलींना संरक्षणासाठी मोफत दांडपट्टा प्रशिक्षण शिबीर, मोफत नेत्र तपासणी शिबीर, वृक्षारोपण इ. कार्यक्रमांचे आयोजन नितीन धार्मिक (राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक), अंबिका पाटील (भाजपा महिलाध्यक्षा), अनिल बर्वे (सामाजिक कार्यकर्ते), ओमसिद्ध बसर्गी (मुख्य तिकिट निरीक्षक रेल्वे), राजेंद्र हक्के (कराटे प्रशिक्षक), एस. एस. बिराजदार (विमल कन्या प्रशाला मुख्याध्यापक) यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. प्रास्ताविक प्रेरणा मैंदर्गीकर (भिमप्रेमी प्रतिष्ठानचे महिला अध्यक्षा) यांनी केला. भिमप्रेमी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विजूदा नागमोडे, महिला उपाध्यक्षा आरती हब्बू तसेच पदाधिकारी चंद्रशेखर पाटील, लक्ष्मी लोंढे, अजय आवार, कुमार आंबट, रोहित बनसोडे, सचिन कदम, अण्णा डवले, मयुर गायकवाड, संतोष स्वामी, विद्या उपळेकर व इतर कार्यकर्ते, शिक्षक यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.




## राव यांची जयंती तेलुगूभाषेतर्फे साजरी

✔ **सोलापूर :** तेलुगूभाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम्तर्फे माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांची १०२वी जयंती साजरी करण्यात आली. येथील संस्थेच्या कार्यालयात त्यांचे प्रतिमा पूजन संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम यांनी केले. दीपप्रज्वलन संस्थेचे सचिव तिप्पण्णा गणेरी यांनी केले. सूत्रसंचालन रेणुका बुधाराम यांनी केले. प्रास्ताविक प्रभाकर भिमनाथ यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीनिवास यनगंदूल यांनी केले. कार्यक्रमास ग्रंथपाल विजयलक्ष्मी गुडूर, लिपीक ओमप्रकाश कमटम, अंबादास फलमारी, तिप्पण्णा गणेरी, भुमय्या सिंगम, रामुलू पोतू, परशुराम, कनकी आदी वाचक सभासद उपस्थित होते.



## सिद्धार्थ संस्थेतर्फे गुणवंतांचा सत्कार

✔ **सोलापूर :** सिद्धार्थ ओम मागासवर्गीय बहुद्देशीय संस्था, डी. एस. बॉयजूच्यावतीने छ. शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त संस्थेचे संस्थापक दादासाहेब सर्वगोड यांच्या विचाराने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक करनकोट, संस्थेचे प्रमुख विकी शिवशरण, एस. के. मेहता, हायस्कूलचे मुख्याध्यापक शशिकांत तोळणुरे, नागेश कोप्पा, मुस्ताक पटेल, पो. माळी, लक्ष्मण साखरेमोळ आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. तर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विजय शिवशरण, उत्सव उपाध्यक्ष कैलास कोळी, सना मुल्ला, प्रतिभा मेंथे, अमिता कांबळे, बालाजी काळे, सिद्धार्थ गायकवाड, सोमनाथ मुष्टेगिरी, शंकर शिंदे, आकाश शितोळे, पवन ठाकूर, पप्पू बनसोडे, आदित्य चौगुले, गोपाल हुलसुरे, कृष्णा उबाळे, कैस बानेवाले, महिबूब हुंडेकरी आदींनी परिश्रम घेतले.

## बंडगर वाचनालयात बालकुमार ज्ञानकोपरा

✔ **सोलापूर :** बंडगर सार्वजनिक वाचनालय, सोलापूर येथील वाचनालयात बाल व कुमार वाचकांसाठी बाल-कुमार ज्ञानकोपरा विभाग सुरु करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथालयाचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. वाचलनालयातमार्फत सर्व प्रथमत: बालकुमार वाचकाचे स्वागत करुन बाल कुमार ज्ञानकोपरा (चिल्ड्रन नॉलेज सेंटर) हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष धोंडीबा बंडगर यांनी माहिती दिली. अध्यक्ष कुंडलिक मोरे यांनी मुलांना समुपदेशन केले. ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय सार्वजनिक ग्रंथालयांना सर्व प्रकारचे सहकार्य करणार असल्याचे सांगितले. नवनाथ वाचनालयाचे ग्रंथपाल आसाध्ये यांनी मुलांना वाचनालय सेवा विनामूल्य निरंतर पुरविण्याचे उद्दिष्ट्य ठेवले. यावेळी ग्रंथालयाचे ग्रंथपाल संगीता थोरात, उमाकांत बंडगर, सरिता चोरमुले, ऐश्वर्या बंडगर, छाया बंडगर, समर्थ चोरमुले, मोहन टकले, कांचन देवकते आदी उपस्थित होते.

## योग केंद्रातर्फे मौन सत्संग संमेलन

✔ **सोलापूर :** योग समन्वय केंद्र शाखा जंगमवाडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील आश्रमात गुरुपौर्णिमेनिमित्त रविवार २ ते ९ जुलैपर्यंत ७ दिवसांचा ५०वा ध्यान-मौन सत्संग निवासी संमेलन आयोजिले आहे, असे केंद्राचे प्रमुख हादीमनी यांनी कळविले आहे.

## सातालोलु यांचे सेट परीक्षेत सुयश



✔ **सोलापूर :** महाराष्ट्र राज्य सहाय्यक प्राध्यापक पात्रता परीक्षा मार्च २०२३ निकाल २७ जून २०२३ रोजी जाहीर झाला. या परीक्षेत गणेश नरसिंग सातालोलु यांनी 'इतिहास' या विषयामध्ये सेट परीक्षा उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे. डॉ. रवीकिरण जाधव, डॉ. माया पाटील यांची विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्व क्षेत्रातून कौतुक होत आहे.

## काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी शकील मौलवी



✔ **सोलापूर :** येथील अल्पसंख्यांक समाजातील ज्येष्ठ नेते शकिल मौलवी यांची सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्याउपाध्यक्ष पदावर अध्यक्ष चेतन नरोटे यांनी नियुक्ती केली आहे. नियुक्तीचे पत्र देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते देऊन शकिल मौलवी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आ. प्रणिती शिंदे, अध्यक्ष चेतन नरोटे, रुस्तुम कंपली, नगरसेवक विनोद भोसले, जुबेर कुरेशी, गणेश डोंगरे, नगरसेवक तौफिक हत्तुरे, रफिक चकोले, अ. लतीफ शेख, अ. रजाक कादरी, तिरुपती परकीपंडला व बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोलापुरात मुस्लीम समाजाचा वधू-वर परिचय मेळावा

✔ सुराज्य/सोलापूर

बागबान चॅरिटेबल ट्रस्ट सोलापूरच्यावतीने सर्व मुस्लीम जमातींचा महाराष्ट्र व कर्नाटकाचा वधूवर महामेळावा आयोजित केलेला आहे.

हा मेळावा रविवार १६ जुलै २०२३ रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत इम्पेरियल गार्डन (पोलीस आयुक्त बंगला, उजनी ऑफिससमोर, सोलापूर) येथे आयोजित केला आहे.

या मेळाव्यात वधू-वरांना समोरासमोर व बायोडाटा समोरासमोर दाखविले जाणार आहे. या मेळाव्यात बागवान, शेख, तांबोळी, अत्तार, कुरेशी, बक्कर खाटीक, खान, पठाण, मनियार, मुल्ला, मोमीन, पटवेघर, मुजावर आदी मुस्लीम जमात यात नोंदणी करु शकतात.

नावनोंदणी नजाकतअली चांदसाहेब मंद्रुपकर, ४२३, जोडभावी पेठ, मंगळवार बाजार, जिनतुल इस्लाम मस्जिदजवळ, सोलापूर, मो. नं. ९९२२३५७०५३ येथे दररोज सायं. ५ ते ७ या वेळेत कार्यालयात येऊन नोंदणी करावी.

नोंदणी फी २०० रुपये असून नाव नोंदणीची तारीख १४ जुलै २०२३ आहे, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष नजाकतअली मंद्रुपकर आणि माजी नगरसेवक रियाज बागवान यांनी केले आहे.

## अण्णाभाऊंची जयंती; कार्यकर्त्यांची आज बैठक

✔ **सोलापूर :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०३ वी जयंती साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्यावतीने सोलापूर शहरात उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यासाठी रविवार २ जुलै २०२३ रोजी सकाळी ठीक ११ वाजता इंपेरियल पॅलेस, सिंचन भवन समोर, मौलाली चौक, दक्षिण सदर बझार, सोलापूर येथे बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी बैठकीस सर्व जयंती उत्सव मंडळे, मिरवणूक मंडळे, संस्था, समाजातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधवांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्यावतीने केले आहे.

## अंमली पदार्थ विरोधी दिन व्यसनमुक्ती केंद्रात साजरा

✔ सुराज्य/सोलापूर

जागतिक अंमली पदार्थ सेवन व अवैध व्यापार विरोध दिन नेहरु युवा केंद्र संचलित व्यसनमुक्ती मानसोपचार केंद्रात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रा. आनंद जाधव, डॉ. सरताज बागवान उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संदेश रॅलीने करण्यात आली.

सदर रॅली ठोकळ प्रशाला, आंबेडकर चौक, आरटीओ ऑफिस ते सुंदरम्‌नगर व्यसनमुक्ती केंद्रामध्ये रॅलीचा समारोप करण्यात आला. समारोप कार्यक्रमात सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते छ. शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमात प्रा. आनंद जाधव यांनी मार्गदर्शन करताना मादक पदार्थांचे व्यसन टाळून आरोग्याचे रक्षण करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना चांगले छंद जोपासणे गरजेचे आहे.

कितीही पैसा आला तरी व्यसनाच्या आहारी जाऊ नये. व्यसनामुळे पूर्ण कुटुंबाचा नाश होतो. विद्यार्थ्यांनी जागरुक बनून कुटुंबाचा विकास साधला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गिरीशचंद्र रणसुभे यांनी केले. प्रास्ताविक व्यसनमुक्ती केंद्राचे प्रकल्प संचालक अनिल हिंगे यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार बापू वारे यांनी केले.

## विविध शाळांमध्ये आषाढी एकादशी साजरी

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील विविध शाळांमध्ये आषाढी एकादशीचा सोहळा भक्तिभावाने पार पडला. या सोहळ्याचे औचित्य साधून बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

**राजमेमोरियल स्कूल**

जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ येथील इंग्लिश स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. डॉ. राधिका चिलका तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी व पालखी यांचे पूजन व विठ्ठलाची आरती करण्यात आली. यानंतर शाळेतील विद्यार्थी लहान मोठे वारकरी वेष परिधान करुन नयनरम्य असा रिंगण सोहळा करण्यात आला. इयत्ता पहिली ते दहावीचे विद्यार्थ्यांसमवेत तसेच विठ्ठल रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मीराबाई यांच्या वेशभूषा परिधान करुन शाळेच्या एक किलोमीटर परिसरात पायी दिंडी काढण्यात आली. सहशिक्षिका दिपाली गलगली व इयत्ता ८वीतील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.



सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थाअध्यक्ष महेश कोठे, डॉ. राधिका चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, विलास बेत, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांची प्रमुख मार्गदर्शन लाभले.

**एनएबी अंधशाळा**

एनएबी जिल्हा शाखा, सोलापूर संचलित एनएबी निवासी अंधकार्यशाळा, सोलापूर येथे आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून नॅब संस्थेचे उपाध्यक्ष अंकुश कदम हे लाभले. मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीची पूजा करुन आरती करण्यात आली. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी अभंग, विठ्ठलाचे भक्तीगीत, रिंगण सोहळा, किर्तन इ. कार्यक्रम उत्साहात करण्यात आले. कार्यशाळेचे अधीक्षक देवेंद्र भंडारे यांनी प्रस्तावना केली. रामचंद्र कुलकर्णी यांनी विठूमाऊलीबद्दल विद्यार्थ्यांना विस्तृतपणे माहिती सांगितली. विद्यार्थ्यांमध्ये मोनिका पांचाळ, दिपांजली केसकर, दयानंद चौगुले यांनी अभंग व भक्तीगीते म्हटले

**जयभारत प्राथमिक शाळा**

जयभारत प्राथमिक शाळेत आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. पालखीची महापूजा संस्थेचे सदस्य मारुती माळगे, संस्थेचे अध्यक्ष सिद्राम फुले गुरुजी, सचिव दीपक फुले, मुख्याध्यापक नारायण सुर्यवंशी यांच्या उपस्थितीत करण्यात आली. विठ्ठलाच्या रुपाची वेशभूषा इ. ६वीमधील आदित्य कोलालू तर रुक्मिणीची वेशभूषा स्वाती भंडारे इ. ७वी, संत तुकाराम स्वप्निल कुमार तर संत ज्ञानेश्वर रोहन बिलोरीवाले यांनी आकर्षक अशी वेशभूषा केली होती.

**आशा मराठी विद्यालय**

निलमनगर भाग ३ व ४ सोलापूर येथील रणजितसिंह मोहिते-पाटील बालक मंदिर, आशा मराठी विद्यालय व धर्मण्णा सादूल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त दिंडी काढण्यात आली. अध्यक्ष संस्थेच्या सचिवा मुमताज शेख व सिद्धाराम खजुरगी अध्यक्ष शरण मठ, धुळप्पा आळंद, संकेत विभूते, नागेश कल्लूर व प्रशालेच्या मुख्याध्यापिका आफरीन सय्यद तसेच प्राथमिकच्या मुख्याध्यापिका तस्लीमबानो पठाण यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी इतर सर्व संत पालखी यांचे पूजन करुन दिंडीला सुरुवात करण्यात आले. गोलरिंगण करण्यात आले. श्रीनिवास करली व पालकवर्ग यांनीही रिंगणात सहभाग घेतला.

**विवेकानंद स्कूल**

आषाढी एकादशीनिमित्त विवेकानंद पब्लिक स्कूल येथे पालखी व दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या संचालिका संगीता सारडा, शाळेच्या प्राचार्या आयेशा इनामदार आणि पूर्व प्राथमिक शाळेच्या प्राचार्या सपना असावा उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात पालखी पूजन व विठुरायाच्या आरतीने झाली. या कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## मनपा पतसंस्थेच्या अध्यक्षपदी शिंदे



✔ **सोलापूर :** सोलापूर महानगरपालिका सर्वसाधारण सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर या संस्थेचे सन २०२३-२४ या कालावधीसाठी चेअरमनपदी भिमराव बसप्पा शिंदे यांची चेअरमन म्हणून एकमताने निवड करण्यात आली.

शिंदे हे सोलापूर महानगरपालिकेत मालमत्ता कर विभागात कार्यरत आहेत. निवड केल्याचे सोलापूर शहर उपनिबंधक अधिकारी व्ही. एस. नाकेदार यांनी जाहीर केले. यावेळी माजी चेअरमन रतन भोसले, संस्थेचे संचालक द्रौपदी भडंगे, पुष्पांजली देसाई, प्रकाश तिगलपल्ली, आनंद गायकवाड, उत्तम कसबे, भिम सीमाफळे, अमर सोनकांबळे, मिथुन बनसोडे, लक्ष्मण जेटीथोर, बसवेश्वर जाधव व सभासद, संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक किरण तिगलपल्ली यांनी केले व उपस्थितांचे आभार सुरेश डोळळे यांनी मानले.

# तरुणीला वाचवणाऱ्या युवकांना मुख्यमंत्र्यांतर्फे १५ लाखांची बक्षिसे सुपूर्द

## ▶ पीडित तरुणीलाही पाच लाखांची मदत

✔ सुराज्य/सोलापूर

शहराच्या मध्यवस्तीत झालेल्या कोयता हल्ल्यात तरुणीचा जीव वाचवणाऱ्या लेजपाल जवळगे, हर्षद पाटील व दिनेश मडावी या तरुणांना मुख्यमंत्र्यांनी प्रत्येकी पाच लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले.

सारसबाग जवळील शिवसेना भवनात पक्षाच्या प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे यांच्या हस्ते ही रक्कम या तरुणांना सुपूर्द करण्यात आली. या आर्थिक मदतीतून त्यांना पुढील शैक्षणिक परिक्षा देण्यासाठी निश्चितच पाठबळ मिळेल, असा संदेशही मुख्यमंत्र्यांनी या समवेत पाठवला. पिडीत तरुणीलाही तिच्या पुढील शिक्षणासाठी पाच लाख रुपयांची मदत करण्यात आली, पीडित तरुणीला मदत करण्यासाठी तिच्या सोबत असलेल्या तिच्या मित्रालाही पंचवीस हजाराची मदत व होणाऱ्या शस्त्रक्रियेचा संपूर्ण खर्च शिवसेनेच्या वतीने करण्यात येणार आहे. यानंतर शिवसेनेच्यावतीने शिष्टमंडळाने पोलीस आयुक्तांची भेट घेत शहरातील महिलांच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना राबवित महिला सुरक्षा धोरण ठरविण्याची मागणी करण्यात आली.

पुणे शहर शिवसेनेच्यावतीने महिलांच्या सुरक्षेसाठी लवकरच टोल फ्री क्रमांक जारी करण्यात येत असून शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात महिला मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. पुण्यात नोकरीच्या निमित्ताने व अभ्यास करण्यासाठी आलेल्या तरुणींना सुरक्षित वाटावे यासाठी पोलीस आयुक्तांनी तातडीने उपाययोजना राबवाव्या, असेही पक्षाच्या प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे म्हणाल्या.



यावेळी सहसंपर्कप्रमुख अजय बापू भोसले, शिवसेना शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे, युवासेना किरण साळी, महिला आघाडी अध्यक्ष लीना पानसरे, पूजा रावेतकर, युवासेना जिल्हाप्रमुख निलेश घारे, शहर संघटक प्रमोद प्रभुणे, शहर समन्वयक शंकर संगम, नवनाथ निवंगुणे, धनंजय जाधव, उपशहर प्रमुख सुधीर कुरुमकर, राजाभाऊ भिलारे, विकी माने, श्रद्धा शिंदे, सुदर्शना त्रिगुणाईत, श्रुती नाझीरकर, सुरेखा कदम, कांचन दोंडे व पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## महत्त्वाचे वृत्त



### लोणावळ्यातील भुशी धरण ओव्हरफ्लो

**लोणावळा** : लोणावळ्यामधील प्रसिद्ध भुशी धरण ओव्हरफ्लो झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून लोणावळ्यासह मावळ परिसरात सतत कोसळत असलेल्या पावसामुळे बहुतांश धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. परिसरातील धबधबेदेखील वाहू लागले आहेत. सह्याद्रीच्या कुशीत वसलेले भुशी धरणदेखील ओव्हरफ्लो झाले असून पायऱ्यावरून पाणी ओसंडून वाहात आहे. गेल्या वर्षी भुशी धरण जून महिन्यामध्येच ओव्हर फ्लो झाले होते. कोसळत असलेल्या पावसामुळे लोणावळ्यातील निसर्ग सौंदर्य अधिकच सुंदर दिसत आहे. लोणावळ्यात गेल्या २४ तासांत १५८ मिमी पाऊस कोसळला आहे.

### संभाजी भिडेंवर कारवाईची मागणी

**सांगली** : स्वातंत्र्यदिन व राष्ट्रगीताचा अवमान करणाऱ्या शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्याविरूध्द त्वरित कारवाई करण्याची मागणी महिला राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे. या मागणीचे निवेदन इस्लामपूर पोलीस ठाण्यात देण्यात आले. याबाबत तालुकाध्यक्षा सुनिता देशमाने म्हणाल्या, स्वातंत्र्यदिन देशभर राष्ट्रीय सण म्हणून साजरा करण्यात येतो. याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा भिडे यांना अधिकारच नाही. स्वातंत्र्यासाठी लाखो लोकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले आहे. राष्ट्रगीताबाबतही त्यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केले असून अशा व्यक्तींना देशभक्त म्हणावे, की देशद्रोही असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. अशा देशद्रोही विचारसरणींच्या व्यक्तींवर त्वरित गुन्हा नोंद करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी.

### शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ

**मुंबई** : राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ४ टक्के महागाई भत्ता वाढ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. ती १ जानेवारी २०२३ पासून लागू करण्यात आली असून, पाच महिन्यांच्या थकबाकीसह जूनच्या वेतनापासून देण्यात येणार आहे.राज्य सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना सध्या ३८ टक्के महागाई भत्ता मिळतो. त्यात ४ टक्क्यांनी वाढ करून तो आता ४२ टक्के करण्यात आला. १ जानेवारी २०२३ पासून ही वाढ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार गेल्या पाच महिन्यांची थकबाकीही रोखीने देण्यात येणार आहे. वित्त विभागाने त्यासंबंधीचा शासन आदेश शुक्रवारी प्रसृत केला. राज्यातील १७ लाख शासकीय अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता वाढीचा लाभ मिळणार आहे.

### शंभरावे नाट्य संमेलन पुढील वर्षी मार्चमध्ये

**मुंबई** : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे १०० वे नाट्यसंमेलन पुढील वर्षी मार्च महिन्यात होणार आहे. त्याचबरोबर, २०२३ - २०२४ च्या शतक महोत्सवी मराठी नाट्य संमेलनानिमित्त विभागीय स्तरावर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळ व विश्वस्त मंडळाच्या मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त सभेत घेण्यात आला.

### आयटीआयमध्ये तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रम

**पुणे** : राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील (आयटीआय) कमी मागणी असलेल्या अभ्यासक्रमांच्या ६५२ तुकड्या बंद करून जास्त मागणी असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या ६५२ तुकड्या सुरू करण्यात येणार आहेत. नव्या अभ्यासक्रमांमध्ये सोलर टेक्निशियन, आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन, ड्रोन टेक्निशियन, इंडस्ट्रियल रोबोटिक्स अँड डिजिटल मॅन्यूफॅक्चरिंग टेक्निशियन, त्रिमितीय मुद्रण (थ्रीडी प्रिंटिंग) अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाने या संदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला. राज्यातील ४१९ शासकीय आयटीआय आहेत.

### हुक्का मेजवानी करणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**डोंबिवली** : डोंबिवली रेल्वे स्थानकाजवळ कॅनरा बँकेसमोरील पाटकर रस्त्यावर तीन इसम शुक्रवारी रात्री भांड्यात जळता कोळश्याचा निखारा घेऊन एका पाईपद्वारे हुक्का सेवनाचा आनंद घेत होते. सार्वजनिक ठिकाणी सुरक्षिततेची कोणतीही काळजी न घेता हा प्रकार तीन जणांकडून सुरू होता. दिवा येथील एक कामगार सागर पाटील यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी तीन अनोळखी इसमांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. इंदिरा चौक, पाटकर रस्ता भागातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. हुक्का मेजवानी करणारे रिक्षा चालक असण्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

### 'क्राईम'चा अधिकारी असल्याचे भासवून फसवणूक

**पिंपरी** : पोलीस अधिकारी असल्याचे भासवून समोरच्या व्यक्तींची फसवणूक आणि गळ्यातील सोनसाखळी हिसकावून चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखा युनिट दोनच्या टीमने बेड्या ठोकल्या आहेत. आरोपीकडून पाच लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. आबालू इराणी असं अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराचं नाव असून त्याच्यावर महाराष्ट्रातील विविध शहरांत गुन्हे दाखल असल्याचं समोर आलेले आहे. त्याला निगडी परिसरातून अटक करण्यात आली.

### जंगली रमी खेळणाऱ्या इसमाची आत्महत्या

**नवी मुंबई** : जंगली रमी खेळून कर्जबाजारी झालेल्या एका व्यक्तीने गळफास लावून आत्महत्या केली आहे. हा प्रकार पनवेल येथे घडला असून, मृत व्यक्तीने आत्महत्येपूर्वी लिहलेल्या चिठ्ठीत आत्महत्येचे कारणही नमूद केले आहे. ऑनलाईन रमीला परवानगी दिल्याने अनेक जण याकडे वळले आहेत. पनवेल येथे राहणारे संजय जुनात्रा (वय ५५) यांनासुद्धा ऑनलाईन रमी खेळण्याची सवय लागली. कमी कालावधीत आपण पैसे कमावू शकतो असे वाटल्याने त्यांनी रमी खेळण्यासाठी कर्ज काढले. ते पैसे हरल्याने अजून कर्ज काढले. मात्र रमीत त्यांना यश न आल्याने ते कर्जबाजारी झाले. या तणावातच त्यांनी गुरुवारी राहत्या घरी आत्महत्या केली.

### काळीसावळी मुलगी झाल्याने विवाहितेचा जाच

**नवी मुंबई** : घरगुती हिंसाचार प्रकरणी तीन नणंद, सासू सासरे आणि पती विरोधात एका विवाहितेने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. प्रेम विवाह होऊनही लग्न झाल्यावर काही दिवसातच शारीरिक मानसिक त्रास देणे सुरु झाले त्यात काही दिवसांपूर्वी पीडितेला मुलगी झाली आणि ती काळी सावली झाली, आम्हाला मुलगाच हवा होता असं म्हणून अधिकचा त्रास देण्यात आला.

# अमेरिकेतील विद्यापीठांत वंशआधारित प्रवेशांना मनाई

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने शिक्षण क्षेत्रात खळबळ

सुराज्य/नवी दिल्ली

**अमेरिकेतील विद्यापीठांत प्रवेशाची प्रक्रिया राबविताना यापुढे वंशाच्या आधारे प्रवेश देता येणार नाही, असा निर्णय अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. देशात सकारात्मक भेदाच्या नावाखाली राबविले जाणारे हे अनेक दशकांचे धोरण त्यामुळे संपुष्टात येणार आहे. येथील शिक्षण क्षेत्र त्यामुळे ढवळून निघाले आहे.**

विभिन्न वंचित गटांना शिक्षणाची संधी मिळावी, या उद्देशाने १९६० मध्ये हे धोरण अवलंबिण्यात आले होते. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिलेला निर्णय मान्य नसल्याची भूमिका राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी मांडली आहे. अमेरिकेतील भेदभाव अद्याप संपलेला नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय आम्ही मान्य करू शकणार नाही, असे ते म्हणाले.

हा निर्णय दिलेल्या न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांपैकी सहा जण परंपरावादी तर, तीन जण मुक्त विचारांचे मानले जातात. शिक्षण सचिवा मायगुएल कॅडरेना यांनी बीबीसीला सांगितले की, शिक्षण संकुलांत विभिन्न गटांना प्रतिनिधित्व मिळावे, यासाठीची महत्त्वाची तरतूद सर्वोच्च न्यायालयाने हिरावून घेतली आहे. पण आमच्या वैविध्याने नटलेल्या देशाप्रमाणेच येथील महाविद्यालये भिन्नतेने सजलेली असावीत, या हेतूला न्यायालयाने बाजूला ठेवलेले नाही. त्यामुळे विद्यापीठ प्रवेशांत विभिन्न गटांना संधी मिळावी हे सुनिश्चित करण्यासाठी व्हाइट हाऊसतर्फे मार्गदर्शक तत्त्वे जारी केली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.



निकालपत्रात मुख्य न्यायमूर्ती जॉन रॉबर्ट यांनी नमूद केले आहे की, 'व्यक्तींची पात्रता निश्चित करताना त्याची क्षमता, कौशल्ये, शिक्षण हे विचारात घेण्याऐवजी त्याचा वर्ण विचारात घेण्याची चुकीची पद्धत गेली अनेक वर्षे विद्यापीठांनी राबविली आहे. पण उत्तर कॅरोलिना असो की, हार्वर्ड, यांचा यामागील उद्देश मात्र चांगला होता, असे निकालपत्रात बहुमताने नोंदवले आहे. त्याचबरोबर आपल्या वंशाचा आयुष्यावर काय परिणाम होत आहे, हे स्पष्ट करण्याची मुभा विद्यापीठांनी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यास द्यावी, असेही न्यायालयाने बजावले आहे. अमेरिकेतील दुसरे कृष्णवर्णीय न्यायाधीश न्या. क्लारेन्स थॉमस यांनी या निर्णयास सहमती दिली. ते परंपरावादी असून प्रवेशातील वर्णाधारित व्यवस्था बंद करण्याची मागणी त्यांनी आधी केली होती. असा भेद घटनाविरोधी असल्याचे त्यांचे मत आहे.'

### काय झाले?

हार्वर्ड आणि उत्तर कॅरोलिना विद्यापीठांतील प्रवेशांबाबत दोन वेगवेगळी प्रकरणे सर्वोच्च न्यायालयापुढे होते. उत्तर कॅरोलिनाबाबत ६-३ ने तर, हार्वर्डबाबत ६-२ अशा बहुमताने या पीठाने निर्णय दिला. कायदा क्षेत्रातील कार्यकर्ते एडवर्ड ब्लूम यांच्या नेतृत्वाखालील स्टुडंट्स फॉर फेअर ॲडमिशन या संघटनेने याबाबत याचिका केली होती. हार्वर्डमधील वंशाधारित प्रवेशांमुळे देशाच्या नागरी हक्क कायदा (१९६४) मधील शीर्षक सहामधील धोरणाचे उल्लंघन झाल्याचा आक्षेप याचिकेत नोंदवला होता. कायद्यातील या तरतुदींनुसार वंश, वर्ण किंवा राष्ट्रीयत्वाचा उगम या बाबींवरून भेद करण्यास मनाई आहे

# आई-वडील, सासू-सासऱ्यांना न सांभाळणाऱ्यांची नोकरी धोक्यात

सुराज्य/पिंपरी

पिंपरी-चिंचवड महापालिकेत अनुकंपा तत्त्वावर आणि लाड-पागेअंतर्गत नोकरी मिळाल्यानंतर आई-वडील, सासू-सासऱ्यांना सांभाळण्यास नकार देणाऱ्या चार कर्मचाऱ्यांना प्रशासनाने नोटीस बजावली आहे.

गेल्या पाच वर्षांत लाड-पागेअंतर्गत ३०७, तर अनुकंपा तत्त्वावर १३७ असे ४४४ कर्मचारी महापालिका सेवेत रुजू झाले आहेत. आरोग्य विभागात काम करणारे सफाई कर्मचारी निवृत्त होण्यास काही वर्षे बाकी असतानाच वारसांच्या पुढील आयुष्याची सोय म्हणून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारतात. कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना अनुकंपा तत्त्वानुसार तसेच लाड-पागे समितीच्या शिफारशींनुसार वारस नियुक्त्या दिल्या जातात. पात्र वारसदार व्यक्तींद्वारे कुटुंबीयांचा सांभाळ करण्याबाबत महापालिका सेवेत रुजू होण्यापूर्वी स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र किंवा बंधपत्र प्रशासनास सादर करतात.


नोकरी मिळेपर्यंत आई-वडील, सासू-सासऱ्यांचा वारस सांभाळ करतात. मात्र, नोकरी मिळताच सांभाळ करण्यास नकार देत असल्याच्या काही घटना समोर आल्या आहेत. त्याबाबत स्वेच्छानिवृत्ती घेतलेले कर्मचारी सातत्याने प्रशासनाकडे तक्रारी घेऊन येत आहेत. कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कारवाईस सुरुवात केली असून चार कर्मचाऱ्यांना नोटीस बजावली आहे.

# पंढरपूर, देहू, आळंदी, पैठण, धापेवडा ही तीर्थक्षेत्रे 'मद्य-मांस मुक्त' करावी

## पंढरपूरच्या वारकरी अधिवेशनात मागणी

सुराज्य/पंढरपूर

'हरिद्वार' आणि 'ऋषिकेश' या तीर्थक्षेत्रांच्या धर्तीवर श्रीक्षेत्र पंढरपूर, देहू, आळंदी पैठणसह विदर्भातील धापेवडा, रामटेक, माहूर ही तीर्थक्षेत्रे व तसेच राज्यातील सर्व मंदिरे अन् तीर्थक्षेत्रे यांचा परिसर शंभर टक्के 'मद्य-मांस मुक्त' करण्यात यावी; पंढरपूर येथील चंद्रभागा आणि आळंदी येथील इंद्रायणी नदीत सांडपाणी सोडण्यास बंदी घालावी, सर्व तीर्थक्षेत्रे, मंदिरांमध्ये 'वस्त्रसंहिता' लागू करावी, अशी एकमुखी मागणी पंढरपूर येथील 'भव्य वारकरी अधिवेशना'त करण्यात आली.



वारकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर येथील श्री बालयोगी महाराज मठ, दत्तघाट येथे 'वारकरी संप्रदाय', 'हिंदु जनजागृती समिती' आणि 'परमहंस परिव्राजकाचार्य स्वामी नारायणानंद सरस्वती' यांच्या संयुक्त हे वारकरी अधिवेशन घेण्यात आले.

या अधिवेशनात संतमहंत, मान्यवर, हरिभक्त परायण, धर्माचार्य, हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या प्रमुखांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी सर्वांनी कोणत्याही परिस्थितीत 'हलाल उत्पादने' विकत घेणार नाही, असा निर्धार व्यक्त केल्याचे 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'चे समन्वयक सुनील घनवट यांनी सांगितले. अधिवेशनासाठी वारकरी समुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्राच्या वटहुकमाविरुद्ध 'आप' सर्वोच्च न्यायालयात

सुराज्य/नवी दिल्ली

दिल्लीतील राज्य सरकारचे प्रशासकीय सेवांवरील नियंत्रण काढून घेणाऱ्या केंद्राच्या वटहुकमाविरोधात शुक्रवारी आम आदमी पक्षाने (आप) सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. केंद्राचा हा वटहुकूम घटनाबाह्य व मनमानी असून त्यावर तातडीने बंदी घालावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

गेल्या महिन्यात केंद्र सरकारने दिल्लीतील अ-प्रवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि त्यांच्यावरील शिस्तभंगाच्या कारवाईचे राज्य सरकारचे अधिकार रद्द करून राष्ट्रीय राजधानी सार्वजनिक



सेवा प्राधिकरण स्थापन करण्याचा अध्यादेश जारी केला.

केंद्राच्या या वटहुकमाला दिल्लीतील अरविंद केजरीवाल यांच्या सरकारने कडाडून विरोध केला आहे. ३ जुलैपासून वटहुकमाच्या प्रती जाळून केंद्र सरकारविरोधात आंदोलन करण्याचा निर्णय आपने घेतला आहे.

पूर्ण राज्याचा दर्जा नसलेल्या दिल्लीसारख्या राज्यांमध्ये लोकनियुक्त सरकारांकडे प्रशासकीय सेवांचे अधिकार राहतील, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिला होता. त्यामुळे नायब राज्यपालांकडे निर्णयाचे अंतिम अधिकार नसल्याचे स्पष्ट झाले. मात्र केंद्र सरकारने वटहुकूम काढून सर्वोच्च न्यायालयाचा निकाल अप्रत्यक्षपणे रद्द केला.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला केंद्र सरकार किंमत देत नसल्याचा आरोप करत केजरीवाल यांनी देशभरातील भाजपेतर विरोधी पक्षांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न चालविला आहे.

### महिलेची छेड काढणाऱ्या व्यवस्थापकाला दिला चोप

**धुळे** : कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याची छेड काढून त्यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या धुळे तालुक्यातील निकुंभे येथील एका खासगी विमा कंपनीचे सहायक व्यवस्थापक नितीन पाटील (वय ३५) याला ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी चांगलाच चोप दिला. ि

शवसेनेच्या कार्यकर्त्यांनी त्याला पोलिसांच्या स्वाधीन केले. कंपनीतील एका विवाहित महिलेला वेगवेगळ्या कारणांवरुन त्रास देऊन अंगलट करण्याचा प्रयत्न तो करीत होता. याबाबत तिने थेट ठाकरे गटाच्या कार्यालयात तक्रार दिली. त्यानंतर ठाकरे गटाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी पाटील याला जाब विचारत कार्यालयातच चोप दिला.

### एक वर्ष लोटले तरी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह बंदच

सुराज्य/मुंबई

मुंबई विद्यापीठाने सांताक्रुझ येथील कलिना संकुलात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज असे वसतिगृह उभे केले. त्याचे उद्‌घाटन जुलै २०२२ मध्ये तत्कालीन कुलपती व माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. परंतु एक वर्षाच्या कालावधीनंतरही हे वसतिगृह विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात आलेले नाही.

राज्यात परदेशी विद्यार्थ्यांच्या संख्येत पुणे आणि मुंबई आघाडीवर आहेत. येणारे बहुतेक विद्यार्थी या दोन शहरांतील विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्यास प्राधान्य देतात. मात्र, त्यांच्यासाठी सुयोग्य सुविधांचा अभाव असल्याची चर्चाही सातत्याने होते असते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी चर्चगेट येथील सी मार्गावर आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह होते.

वसतिगृहाची इमारत जीर्ण झाल्यामुळे ती राहण्यासाठी धोकादायक होती. त्यामुळे हे वसतिगृह बंद करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला.

# वेगळ्या विदर्भाला जनतेचे समर्थन नसल्याचा गडकरींचा दावा

सुराज्य/नागपूर




वेगळ्या विदर्भाच्या आंदोलनात १००-२०० लोकांपेक्षा जास्त लोक येत नाहीत. वेगळ्या विदर्भाच्या मुद्याला जनतेचे समर्थन नाही. जोपर्यंत जनतेचे समर्थन मिळत नाहीत तोपर्यंत वेगळा विदर्भ कसा होईल, असे परखड मत नागपूरचे खासदार व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मांडले आहे.

रामदासपेठ येथील एका हॉटेलात आयोजित कार्यक्रमांतर्गत शुक्रवारी त्यांची मुलाखत घेण्यात आली. यावेळी त्यांनी विदर्भाचा विकास, वेगळा विदर्भ यावर मते व्यक्त केली. वेगळ्या विदर्भाची मागणी आता बाजूला पडली काय, असा प्रश्न गडकरी यांना विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, मी तर याबाबत कधीच बोलत नाही. आमच्या पक्षाने ज्यावेळी वेगळा विदर्भाचा ठराव घेतला, त्यावेळी मला समर्थन असल्याचे वाटत होते. पण या विषयाला जनतेचे समर्थन नाही. विदर्भाच्या आंदोलनात १००-२०० लोकांपेक्षा जास्त लोक येत नाहीत. जर उद्या या आंदोलनात दहा हजार, एक लाख आले आणि दिवंगत जांबुवंतराव धोटे यांच्यासारखे आंदोलन झाले तर त्यामध्ये मीपण सामील होईल. जोपर्यंत जनतेचे समर्थन वेगळ्या विदर्भाच्या आंदोलनाला मिळत नाहीत तोपर्यंत वेगळा विदर्भ कसा होईल, असा सवालही त्यांनी केला.

महाराष्ट्रात राहून विदर्भाचा विकास होण्याकरिता गेल्या आठ-नऊ वर्षांत जेवढी कामे केली तेवढी ६०-७० वर्षांत झाली नाही. चांगले रस्ते बनले. चांगले उद्योग यायला लागले. बघता-बघता विदर्भ बदलला आहे. विदर्भाच्या लोकांना विदर्भाच्या राजकारणात रुची नाही. खादीचे कडक कपडे घालून फिरणाऱ्या नेत्यांसमोर ते बोलत नाहीत एवढेच.

येथील लोकांना विकास महत्त्वाचा आहे. त्यांचे स्वप्न पूर्ण करणारा नेता आणि पक्ष असेल त्यांच्या मागे जनता उभी राहते, असेही गडकरी म्हणाले.

# कर्नाटक उच्च न्यायालयाने 'ट्विटर'ची याचिका फेटाळली

## केंद्राविरुध्द याचिका ५० लाखांचा दंड

सुराज्य/बंगळुरु

कर्नाटक उच्च न्यायालयाने शुक्रवारी 'ट्विटर'ने दाखल केलेली याचिका फेटाळली. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने अनेक खाती गोठवणे, ट्वीट हटवण्याच्या दिलेल्या आदेशांना या याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले होते. कंपनीची याचिका योग्यता नसलेली होती, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती कृष्णा एस. दीक्षित यांच्या एकल खंडपीठाने ही याचिका फेटाळताना 'ट्विटर'ला ५० लाखांचा दंडही ठोठावला. ही रक्कम ४५ दिवसांच्या आत



कर्नाटक राज्य विधि सेवा प्राधिकरणाला देण्याचे आदेश दिले. न्यायालयाने निकालाचा मुख्य भाग वाचून दाखवला, 'उपरोक्त परिस्थितीत, ही याचिका अयोग्य असल्याने, दंडासह फेटाळण्यास पात्र आहे. त्यानुसार ती फेटाळण्यात आली आहे. याचिकाकर्त्याला ५० लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे, जो बंगळुरु येथील कर्नाटक राज्य विधि सेवा प्राधिकरणास ४५ दिवसांत देण्यात यावा. त्यास विलंब झाल्यास प्रतिदिन पाच हजार रुपयांचे अतिरिक्त शुल्क आकारले जाईल.'

'ट्विटर'ने २ फेब्रुवारी २०२१ ते २८ फेब्रुवारी २०२२ दरम्यान मंत्रालयाने दिलेल्या दहा विविध आदेशांना आव्हान दिले होते. 'ट्विटर'ने यापूर्वी दावा केला होता की सरकारने एक हजार ४७४ खाती, १७५ ट्वीट, २५६ यूआरएल आणि एक हॅशटॅग 'ब्लॉक' करण्याचे निर्देश दिले होते, परंतु यापैकी केवळ ३९ यूआरएल संबंधित आदेशांना 'ट्विटर'ने आव्हान दिले होते. न्यायमूर्ती दीक्षित यांनी विविध पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर २१ एप्रिल २०२३ रोजी आपला निकाल राखून ठेवला होता. निकालाचा मुख्य भाग ३० जून रोजी सुनावण्यात आला.

### केंद्राचा ट्वीट हटवण्याचा अधिकार

'ट्विटर'ची याचिका फेटाळताना, न्यायमूर्तींनी नमूद केले की, केंद्राला 'ट्वीट' हटवण्याचा (ब्लॉक) आणि खाते गोठवण्याचा अधिकार आहे याच्याशी न्यायालय सहमत आहे. न्यायालयाने निकालात आठ प्रश्नांवर विचार केला. त्यापैकी फक्त एका प्रश्नाचे उत्तर 'ट्विटर'च्या बाजूने आहे, जे याचिका दाखल करण्याच्या अधिकाराशी संबंधित आहे, तर उर्वरित प्रश्नांची उत्तरे कंपनीच्या विरोधात गेली आहेत. यामध्ये माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या 'कलम ६९ अ'च्या वापरासाठी मार्गदर्शक तत्त्वे प्रसृत करण्याच्या 'ट्विटर'च्या विनंतीचाही समावेश आहे. न्यायाधीश म्हणाले की, मी आठ प्रश्न तयार केले आहेत. पहिला प्रश्न अधिकारक्षेत्राचा आहे, ज्याचे उत्तर मी तुमच्या बाजूने दिले आहे.

# सर्वत्र काळोख... स्फोटाचा आवाज आणि आक्रोश...



# बर्निंग बसचा थरार

**"बुलढाण्याजवळ समृद्धी महामार्गावर रात्रीची किर्र होती.अनेकजण साखर झोपेत होते तर काहीजण जागेही होते. अचानक बस उलटली...स्फोटाचा आवाज आला... बसने पेट घेतला...ज्यांना संधी मिळाली ते बाहेर पडले.ज्यांना बाहेर पडता आले नाही वा मदत मिळाली नाही,अशांना मृत्यूने कवटाळले. या अपघाताची आपबिती..."**

## लोक आगीत होरपळत होते, काचा फुटाव्यात म्हणून प्रयत्न करत होते, पण... प्रवाशाने सांगितली आपबिती



महाराष्ट्रातल्या बुलढाणा या ठिकाणी समृद्धी महामार्गावर भीषण अपघातातील बस आधी एका खांबाला आदळली, त्यानंतर डिव्हायडरला आदळून उलटली. यामुळे या बसला आग लागली. ही आग डिझेच्या टँकपर्यंत पोहचल्याने त्या टँकचा स्फोट झाला. या अपघातातून जीवंत वाचलेल्या एका प्रवाशाने सांगितलं, मी विदर्भ ट्रॅव्हल्सच्या बसमध्ये बसलो होतो. समृद्धी महामार्गावर बसचा अपघात झाला. आमच्या बसचा टायर फुटला. त्यानंतर बसला आग लागली. बघता बघता आग पसरु लागली आणि वाढली. या ठिकाणी १० ते १५ मिनिटात अग्निशमन दलाचे लोक आले. त्यांनी आग नियंत्रणात आणली. पोलीस आणि अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी पोहचले होते. तिथल्या एका स्थानिकाने सांगितलं की आम्ही पाहिलं की चार ते पाच प्रवासी काच फोडून बाहेर पडले आम्ही पाहिलं. तसंच या प्रवाशाने सांगितलं की आम्ही मदतीसाठी ओरडत होतो. आकांत करत होतो पण कुणीही मदतीसाठी थांबत नव्हतं. आम्ही जेव्हा अपघात स्थळी पोहचलो तेव्हा आम्ही पाहिलं की इथलं दृश्य पाहिलं ते भयंकर होतं. टायर बाजूला पडले होते. संपूर्ण बसने पेट घेतला होता. एकंदरीत खूप भयंकर परिस्थिती या ठिकाणी होती. आम्हाला सगळं दिसत होतं पण आम्ही काही करु शकत नव्हतो. अपघात झाल्यानंतर काही जण मागच्या बाजूला पळाले आणि काही लोक मागच्या बाजूला पळाले. पण त्यांच्याजवळच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या नाहीत ते होरपळले आणि त्यांचा मृत्यू झाला. आम्हाला अपघातातून वाचलेल्या लोकांनी हे देखील सांगितलं की, अपघातानंतर आम्ही लोकांना थांबण्यासाठी याचना करत होतो आकांत करत होतो.

## वणीचा आयुष ठरला आयुष्यमान!

### अंगावर काटा आणणारा थरारक अनुभव केला कथन



शुक्रवारी मध्यरात्री सिंदखेड राजा येथे झालेल्या विदर्भ ट्रॅव्हल्सच्या भीषण अपघातात २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला. या अपघातात वणी (जि. यवतमाळ) येथील आयुष घाडगे हा प्रसंगावधान राखल्याने बचावला. जणू त्याचे आयुष हे नाव सार्थक ठरले आणि तो आयुष्यमान झाला! एका खाजगी वृत्तवाहिनीशी बोलताना आयुषने या अपघाताचा थरार सांगितला. आयुष नागपूर येथे नोकरी करतो. तो बुटीबोरी येथून विदर्भ ट्रॅव्हल्समध्ये बसला. सर्वात शेवटी ३० नंबरची त्याची सीट होती. त्याचे अन्य तीन मित्र वणी येथून दुसऱ्या खासगी बसने निघाले होते. ते चौघेही पुणे येथे जात होते. आधी चौघेही विदर्भ ट्रॅव्हल्सने सोबतच जाणार होते. मात्र प्लॅन बदलला आणि आयुष नागपूरहून विदर्भ ट्रॅव्हल्सने निघाला. प्रवासादरम्यान तो आपल्या मित्रांच्या संपर्कात होता. त्यामुळे दुसऱ्या बसने निघालेले मित्र मागे असल्याचे त्याला माहीत होते. गाडी जेवण करण्यासाठी कारंजाच्या पुढे थांबली. सिंदखेडराजा येथे पिंपळखुटा येथे रात्री सव्वा वाजताच्या सुमारास गाडी दुभाजकाला धडकली आणि उलटली.


अंगावर वरचे लोक पडल्याने तो खडबडून जागा झाला.गाडीत हलकल्लोळ माजला होता. आयुष आणि इतर तिघांनी प्रसंगावधान राखत आपल्या समोरची काच फोडून गाडीतून बाहेर उड्या घेतल्या. त्यानंतर काहीच वेळात डिझेल टँकचा स्फोट होऊन ट्रॅव्हल्सने पेट घेतला. त्यामुळे जीव वाचविण्यासाठी कोणालाही संधीच मिळाली नाही. अन्य प्रवाशांचा होरपळून मृत्यू होताना परिसरात आर्त किंकाळ्या आणि आगीच्या ज्वाळाच होत्या. तो अनुभव भयानक होता. मागाहून आलेल्या ट्रॅव्हल्समध्ये अन्य तीन मित्र आले. त्यांनी आवाज देऊन आपल्याला शोधले. मी प्रतिसाद दिल्यानंतर मित्रांनाही अश्रू अनावर होऊन त्यांनी घट्ट मिठी मारली. काय करावे काही सुचत नव्हते. पोलिसांना माहिती दिली. पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. मी मित्रांसोबत औरंगाबादकडे दुसऱ्या ट्रॅव्हल्सने रवाना झालो, असे आयुषने सांगितले.

## पंतप्रधान मोदींनी व्यक्त केलं दु:ख



समृद्धी महामार्गावर अपघातावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. तसेच, मृतांच्या कुटुंबियांना २ लाखांची, तर जखमींना ५० हजारांची मदत पंतप्रधानांनी जाहीर केली आहे.महाराष्ट्रातील बुलढाणा येथे झालेल्या भीषण बस दुर्घटनेनं अतिशय दु:ख झाले आहे. अपघातातील ज्यांनी प्राण गमावले त्यांच्या कुटुंबाबरोबर माझ्या प्रार्थना आहेत. जखमी लवकर बरे व्हावेत, असं ट्वीट पंतप्रधान मोदींच्या कार्यालयाने केलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही अपघातावर ट्वीट करत दु:ख व्यक्त केलं आहे.

## 'तो' मुलाखतीसाठी निघाला, पण; नागपूरचा कौस्तुभ काळे अपघातात ठार



चांगली नोकरी मिळावी म्हणून नागपूरच्या बेसा भागात राहणारा कौस्तुभ काळे हा युवक पुण्याला मुलाखत देण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी बैद्यनाथ चौक येथील विदर्भ ट्रॅव्हलने नागपूरवरून निघाला. सिंदखेडजवळ झालेल्या अपघातात त्याचा मृत्यू झाला. आपला भाऊ येणार आणि नागपूरवरून पुण्याला सकाळी पोहोचणार म्हणून त्याचा मामेभाऊ त्याला घेण्यासाठी सकाळी पोहोचला, मात्र त्याची गाडी आलीच नाही. त्याने विचारपूस केली तर त्याला अपघाताची माहिती मिळाली आणि तो सुन्न झाला.बेसा भागात राहणारा कौस्तुभ काळे हा नागपूरला एका खाजगी कंपनीत डिलीवरी बॉय म्हणून नोकरी करत होता. कौस्तुभ हा एकुलता एक भाऊ आणि दोन बहिणी आहे. आई-वडील म्हातारे आहे. त्यामुळे घरची सगळी जबाबदारी त्याचावर होती. डिलीवरी बॉय म्हणून नोकरी करत असताना चांगली नोकरी मिळावी म्हणून पुण्याला तो एका खाजगी कंपनीत मुलाखत देण्यासाठी तो निघाला. आई-वडिलांचा आशीर्वाद घेऊन आणि बहिणीला सांगून बैद्यनाथ चौकातून ट्रव्हल बसने निघाला आणि शनिवारी सकाळी ट्रव्हल्सचा अपघात झाला.




प्रवेश! प्रवेश!! प्रवेश!!!

श्री गुरु सिध्दमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित

**श्री.रावजी गणेश कुलकर्णी मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह गौडगांव (बु॥), ता.अक्कलकोट**



श्री गुरु सिध्दमल्लेश्वर

आमच्या वसतिगृहामध्ये सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देणे चालू आहे. तरी गरजू विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा.

ठळक वैशिष्ट्ये

१) प्रशस्त इमारत
२) राहण्याची व जेवणाची उत्तम सोय
३) भरपूर क्रीडा साहित्य
४) शैक्षणिक प्रगतीकडे वैयक्तिक लक्ष
५) शासनाच्या नियमानुसार सर्व सवलती उपलब्ध
६) पिण्यासाठी शुद्ध पाण्याची सोय
७) शौचालय व स्नानासाठी उत्तम सोय



श्री.एम.एम.म्हेत्रे मो.7276127899 | मुख्याध्यापक श्री.के.ए.देशेट्टी मो.7264854125 | अधीक्षक श्री.आर.एस.हिरेमठ मो.9404045055


## 'समृद्धी'वर बसचा अपघात कसा झाला? परिवहन खात्याचा अहवाल काय सांगतो



मृद्धी महामार्गावर सिंदखेडराडा येथे शुक्रवारी रात्री १.३२ वाजताच्या सुमारास विदर्भ ट्रॅव्हल्सच्या अपघातात २५ प्रवाश्यांचा जळून मृत्यू झाला. या अपघाताबाबत परिवहन खात्याचा अहवाल पुढे आला आहे. त्यात बरीच महत्वाची माहिती पुढे आली आहे. अहवालानुसार, या अपघातग्रस्त वातानुकुलीत स्लिपर संवर्गातील बसचा क्रमांक 'एमएच-२९, बीई- १८१९' आहे. त्याची नोंदणी २४ जानेवारी २०२० रोजी झाली आहे. बसला १० मार्च २०२३ रोजी आरटीओकडून नव्याने योग्यता प्रमाणपत्र मिळाले आहे. या वाहनाचा परवाना २०२५ पर्यंत वैध आहे.

वाहनाला स्पीड गवर्नर लागलेला आहे. या बसच्या अपघाताचे ठिकाण हे कारंजा इंटरचेंज पासून १५२ किलोमीटर अंतरावर आहे. प्रवाश्यांकडून मिळालेल्या माहितीसह प्रत्यक्ष निरीक्षणानंतर आरटीओच्या अधिकाऱ्यांना लक्षात आले की, ही बस सर्वप्रथम रस्त्याच्या उजव्या बाजुला असलेल्या स्टीलच्या पोलला धडकली. यांनंतर वाहन चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे बस पुन्हा रस्त्याच्या दुभाजकास धडकली. त्यात बस समोरचे एक्सलचा सांधा निखळला व पुन्हा या बसची उजवी बाजू रस्ता दुभाजकास डिझेलची टाकी असलेल्या भागात धडकली. त्यामुळे बसचे आवरन कापल्या गेले. त्यानंतर बसच्या पुढची बाजू सिमेंट रस्त्यावर आदळली. या घर्षनात उष्णता निर्माण होऊन इंजीन ऑईल आणि डिझेपशी त्याचा संपर्क येऊन बसने पेट घेतला. बस डाव्या बाजूला उलटल्याने प्रवाश्यांना ये- जा करणारी मार्गिका बंद झाली. सोबत बस उलटल्याने बसच्या बॉडीचे संतुलन बिघडल्याने आपातकालीन दरवाजाही निष्क्रीय झाला. टायर फुटल्यामुळे अपघात झाल्याचा कुठलाही पुरावा आढळला नाही. तसेच टायरचे रस्तयावरील निशाणी धडकेचे निशान हे पुढील चाकाच्या डिस्क पर उजव्या बाजुला वाकलेले आढळून आले. बस अतिवेगात नव्हती. ही बस समृध्दी महामार्गावर रात्री ११.०८ वाजता मार्गस्थ होऊन अपघात रात्री १.३२ वाजता झाला. याचाच अर्थ बसने १५२ किलोमिटरचे अंतर २ तास २४ मिनीटात पार केले. म्हणजे या बसचा वेग ७० किलोमिटर एवढा असल्याचेही प्रादेशिक परिवहन कार्यालय अमरावतीने परिवहन खात्याला दिलेल्या अहवालात पुढे आले आहे.




## पोलिसांनी सांगितला समृद्धी महामार्गावरील अपघाताचा घटनाक्रम

**बुलढाण्यात समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला आणि बसला लागलेल्या आगीत २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला. यानंतर देशभरातून या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला जात आहे. हा अपघात नेमका कसा झाला? पहाटेच्यावेळी झालेल्या या अपघाताचा घटनाक्रम काय होता याविषयी अनेक तर्कतवितर्क लावले जात आहेत. अशातच पोलिसांनी या अपघाताचा घटनाक्रम सांगत माहिती दिली. पोलिसांनी शनिवारी (१ जुलै) बुलढाण्यात पत्रकारांना माहिती दिली. पोलीस म्हणाले, पहाटे १.३५ वाजल्याच्या सुमारास समृद्धी महामार्गावर अपघात झाला. ही बस आधी समृद्धी महामार्गावरील वीजेच्या खांबाला धडकली. धडकेनंतर बस पुढे आल्यावर डिझेल टँक दुभाजकाला लागला. यामुळे डिझेल टँक फुटला. पुढे बस दुभाजकाला घासत गेली आणि त्यामुळे बस उलटी होऊन आग लागली.**




### बसच्या काचा फोडून बाहेर आलेल्या ८ प्रवाशांचा प्राण वाचला

या बसमध्ये एकूण ३३ लोक होते. मॅनिफेस्टमध्ये २६-२७ लोक होते. काही प्रवासी रस्त्यात येताना घेतले असतील. यापैकी बसच्या काचा फोडून बाहेर पडता आलं अशा ८ प्रवाशांचा प्राण वाचला आहे. त्यात २५ वर्षीय चालकाचाही समावेश आहे. चो दारव्हाचा असून शेख दानिश शेख इस्माईल असं या चालकाचं नाव आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

### बसमध्ये दोन चालक, एकाचा मृत्यू

बसमध्ये दोन चालक होते आणि एक क्लिनर होता. यापैकी एका चालकाचा मृत्यू झाला आहे. जो चालक बस चालवत होता तो सुखरुप आहे. आतापर्यंत पोलिसांनी २५ मृतदेह बुलढाण्याला पाठवले आहेत, असंही पोलिसांनी नमूद केलं.

## जोया शेखची ईद ठरली अखेरची...



नागपुरातील दिघोरी या भागात राहणाऱ्या जोया शेख यांची ईद अखेरची ठरली घरची बेताची परिस्थिती, त्यात अवेळी वडिलांच्या मृत्यू आणि आईची प्रकृती कायम अस्वस्थेमुळे घराची सर्व जबाबदारी ३ भावडांवर येऊन पडली, त्यातील मोठा भाऊ अझरुद्दीन शेख आणि झाकीर शेख हे टाइल्स बसविण्याची काम करतात. तर बहीण जोया शेख ही एका इव्हेंट कंपनीत काम करत होती.कामातून सुट्टी घेत नुकतीच पार पडलेल्या ईद सणांच्या निमित्याने घरी आलेली जोया ईदनंतर परत कामासाठी पुण्याला परत जात असताना काळाने तिच्यावर झडप घातली

## सर्वाधिक बळी घेणारा अपघात !

गेल्या सहा महिन्यांत वाहनांचे टायर फुटून समृद्धीवर ८१ अपघात झाले. सिंदखेडराजा जवळील पिंपळखुटा येथे लक्झरी बसचा भीषण अपघात बसचा टायर फुटल्याने झाल्याचे सांगण्यात येते. गेल्या सहा महिन्यांत वाहनांचे टायर फुटून समृद्धीवर ८१ अपघात झाले, तर आजचा अपघात हा ८२ वा असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. मे २०२३ पर्यंत बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर ३५८ अपघात झाल्याची महामार्ग पोलिसांची माहिती आहे. शिर्डीवरून दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन झाल्यानंतर अपघातांच्या प्रमाणात अधिक वाढ झाल्याचे दिसून आले आहे. समृद्धीवरील दरदिवशीचे नवे अपघात ही चिंतेची बाब झाली आहे. 'महामार्ग संमोहन' या कारणामुळे चालकाला डुलकी लागून १०४ अपघात घडले आहेत. आजवर समृद्धीवरच्या अपघातांमध्ये ३९ जण मृत्यू पावले, तर आजच्या २५ मृतांमुळे हा आकडा ६४ झाला आहे. अपघातांमध्ये १३४ गंभीर तर २३६ किरकोळ जखमी झाले आहेत. १५३ किरकोळ अपघातांमध्ये कुणीही जखमी झाले नाही. उष्ण तापमान, वाहनांचा अतिवेग यामुळे टायर फुटणे, महामार्ग संमोहनामुळे चालकाला डुलकी लागून वाहन अनियंत्रित होऊन कठड्यांना धडकणे, अन्य वाहनाला धडक देणे अथवा रस्त्याच्या खाली जाऊन अपघात घडणे, या कारणांमुळे घडलेल्या अपघातांची मालिका मोठी आहे.प्राणी आडवे आल्याने १८ अपघात; तर तांत्रिक बिघाडामुळे १६ आणि वाहन बिघाड होऊन १४ अपघात समृद्धीवर घडले. इतर काही कारणांमुळे ७४ अपघात झाले. वाहनाचा अतिवेग हे अपघातांमध्ये प्रमुख कारण आहेच. चालकांना प्रबोधन करण्यासाठी परिवहन विभागाने समृद्धीच्या इंटरचेंजवर विशेष कॅम्प घेतले. येवढे करूनही अपघातांची मालिका सुरूच आहे.



## इंजिनिअर झाली, पण जॉईनिंग नशिबी नव्हतं; संजीवनीच्या स्वप्नांची राखरांगोळी



बसचा अपघात झाल्यानंतर पुढच्या काही क्षणांमध्ये पेट घेतला. त्यामुळे आत असलेल्या अनेकांना स्वत:चा जीव वाचवण्याची कोणतीच संधी मिळाली नाही. या बसमधून संजीवनी शंकरराव गोठे ही २२ वर्षांची तरुणी प्रवासी करत होती. वर्ध्याच्या अल्लीपूरमध्ये राहणारी संजीवनी पुण्याला निघाली होती. मात्र पुण्यात जाऊन नोकरी करण्याचं तिचं स्वप्नं भंगलं. इंजिनीअरिंग पूर्ण केलेली संजीवनी कुटुंबियांना सोडून कायमची निघून गेली.

## पुण्यातील एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू



समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात पुण्यातील एक चौकोनी कुटुंब उध्दवस्त झालं आहे. शिरुरमधील एकाच घरातील आई, वडील आणि लेकीचा या अपघातात अंत झाला आहे. कैलास गंगावणे, कांचन गंगावणे आणि त्यांची लेक सई गंगावणे हे तिघं त्यांच्या मुलाच्या सेवा विधी महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया करण्यासाठी पुण्याहून नागपुरात गेले होते.

## वर्ध्याच्या अवंतीचा दुर्दैवी अंत



अपघातात वर्ध्याच्या अवंती पोहनेकर या इंजिनिअर तरुणीचाही दुर्दैवी अंत झाला. अवंतीच्या वडिलांचं ती लहान असतानाच निधन झालं होतं. त्यानंतर तिच्या आईने एकटीने अवंती आणि तिची बहीण मोनू यांना वाढवलं. मृत अवंतीची बहीण मेघे विद्यापिठात कामाला असल्याची माहिती आहे. अवंतीने मॉडेल म्हणून मोठी प्रसिद्धी मिळवली. अवंती या बसने वर्ध्याहून पुण्याला नोकरीसाठी निघाली होती. पण शनिवारी समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात तिचा करुण अंत झाला.